भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विक्रम अभिवादन!

कृषीवल

रायगड ॥ गुरुवार, दिनांक १४ एप्रिल २०२२

किंमत ४ ₹

आतील पानांमध्ये

६ बाबासाहेबांची प्रेरणा पीडितांच्या हक्कांसाठी आजन्म लढा

रायगडावर डॉ.बाबासाहेब

७ कोकणातील खोतीविरुद्धचा लढा

म ह त्त्वा चे

सदावर्तेंना १४ दिवस न्यायालयीन कोठडी

। मुंबई । प्रतिनिधी ।

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवारांच्या घरासमोर आंदोलन करणाऱ्या आंदोलकांना चिथावणी दिल्याप्रकरणी गुन्हा नोंद असलेल्या ॲड. गुणरत्न सदावर्ते यांना बुधवारी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. सदावर्तेंना सात दिवसांची पोलीस कोठडी द्या अशी मागणी पोलिसांनी केली होती. आरोपी अभिषेक पाटील आणि चंद्रकांत सुर्यवंशीला १६ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सदावर्तेंचा जामीनासाठी अर्ज करण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला आहे.

सोमय्यांना कोर्टाचा दिलासा

। मुंबई । प्रतिनिधी ।

आयएनएस विक्रांत निधी प्रकरणी भाजप नेते किरीट सोमय्यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला असून, न्यायालयाने किरीट सोमय्यांना अटकेपासून संरक्षण दिले आहे. तसेच, अटक झाल्यास ५० हजारांच्या जामीनावर सुटका करण्याचे निर्देश दिले आहेत. सोमय्या यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, न्यायालयाने सोमवारपासून (दि.१८) सलग चार दिवस चौकशीला हजेरी लावण्याचे निर्देश दिले आहेत.

नवाब मलिकांच्या मालमत्तेवर टाच

। मुंबई । प्रतिनिधी ।

मनी लॉंडरिंग प्रकरणी सध्या कोठडीत असलेले राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक यांच्या ८ मालमत्ता ईडीकडून जप्त करण्यात आल्या आहेत. यातमलिकांचीउस्मानाबाद येथील १४७ एकर शेतजमीन, वांद्रे पश्चिममधील दोन फ्लॅट्स, कुर्ला पश्चिममधील ३ फ्लॅट्स, कुर्ला पश्चिममधील कमर्शियल युनिट आणि गोवावाला कपाउंडमधील मालमत्तेचा समावेश आहे. मेसर्स सोडियस इन्वेस्टमेंट प्रा. लि. आणि मेसर्स मलिक इन्फ्रास्ट्रक्चर या मलिकांच्या मालमत्तांवरदेखील ईडीने टाच आणली आहे.

बागमळा येथे अपघातात १९जखमी

एसटी,जेएसडब्ल्यू बसची धडक

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

तालुक्यातील बागमळा येथे एसटी बस आणि जे एसडबल्यू बसमध्ये समोरासमोर जोरदार ठोकर होऊन अपघात झाला. हा अपघात एवढा भीषण होता की, यात दोन्ही बस मधले १९ जण जखमी झाले आहेत. या अपघातामुळे अलिबाग-रेवदंडा रस्त्यावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती.

अलिबाग तालुक्यातील बागमळा येथील शारदा पेट्रोल पंपाजवळ हा अपघात झाला. रेवदंडा येथील जेएसडब्ल्यू कंपनीच्या कर्मचारींना घेऊन जाणारी बस आणि मुरुडहून अलिबागकडे •➢ पान २ वर

आ.जयंत पाटील यांच्या प्रयत्नातून

वरसोलीत मार्गदर्शक स्तंभ होणार

निविदा प्रक्रिया सुरु मच्छिमार सोसायटी, नाखवा संघाकडून धन्यवाद

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी । शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्या प्रयत्नांतून तालुक्यातील वरसोली खाडी मुखाजवळ मार्गदर्शक स्तंभाच्या रिंग बोयाची उभारणी करण्यात येणार असून त्यासाठीची निविदा सुचना काढण्यात आली आहे. त्यामुळे आता हे काम लवकर मार्गी लागून खाडीत प्रवेश करताना मच्छिमार नौकांचा धोका कमी होणार आहे. जयंत पाटील यांच्या प्रयत्नांमुळेच हा प्रश्न मार्गी लागल्याने वरसोलीमधील मच्छिमार सोसायटी, नाखवा संघ, गाव पाटील आणि मच्छिमार समाजाने समाधान व्यक्त करीत जयंत पाटील आणि शेकापला धन्यवाद दिले आहेत.

समुद्रात मासेमारीसाठी जाताना तसेच परतत असताना वरसोली येथील खाडीतून प्रवेश करणे धोकादायक बनले आहे. मोठ्या प्रमाणावर मोठमोठ्या दगडांचा सामना करावा लागत असल्याने मच्छिमार नौकांसाठी हा मार्ग •➢ पान २ वर

> मच्छिमारांचे प्रश्न आपण जयंत भाईंच्या कानावर घातले. मच्छिमार समाजाबाबत विशेष प्रेम असल्याने आजारी असतानाही भाईंनी कसलीही तमा न करता त्वरीत येऊन अधिकाऱ्यांना बोलावले. आणि प्रश्न मार्गी लावला.
>
> – सुरेश घरत
> वरसोली ग्रामपंचायत सदस्य

> लाटांच्या माऱ्यामुळे खाडीच्या तोंडावर मच्छिमार बोटींना मोठा धोका होता. आतापर्यंत दोन बोटींना जलसमाधी मिळाली आहे. वारंवार मागणी करुन देखील शासन लक्ष देत नव्हते. मात्र आ. जयंत भाईंच्या कानावर घालताच ते जायबंदी असताना देखील स्वतः वरसोली किनाऱ्यावर येऊन त्या परिस्थितीची पाहणी केली. त्यांच्या प्रयत्नांमुळेच आज हा प्रश्न मार्गी लागून रिंग बोया उभारण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व मच्छिमारांच्या वतीने त्यांना धन्यवाद.
>
> – धर्मा घारबट, चेअरमन
> मार्तंड विकास सहकारी संस्था, वरसोलीच

पनवेलमध्ये महागाईच्या विरोधात मविआचा मोर्चा

। पनवेल । वार्ताहर ।

गेल्या काही दिवसापासून दररोज केंद्र शासनाकडून पेट्रोल व डिझेलचे दर गगनाला भिडत चालले असून सर्वसामान्यांचे गॅस व भाजीपाल्याच्या वाढत्या दरामुळे दररोजचे बजेट कोलमडले आहे. या दरवाढीविरोधात बुधवारी (१३ एप्रिल) पनवेलमध्ये शिवसेना, शेकाप, राष्ट्रवादी, काँग्रेस व समाजवादी या महाविकास आघाडीच्या पक्षाने एकत्र येऊन दणदणीत मोर्चा काढत केंद्र शासनाचा निषेध केला. या मोर्चाचे नेतृत्व पनवेल आ.बाळाराम पाटील, शिवसेना जिल्हा सल्लागार बबन पाटील व सुदाम पाटील यांनी केले.

यावेळी मोर्चेकऱ्यांसमोर बोलताना शेकापचे आ.बाळाराम पाटील यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या हुकूमशाही कारभारामुळे रडकुंडीला आलेल्या सामान्य जनतेच्या पाठीशी महाविकास आघाडी ठामपणे उभी असून या सर्व समस्यांमधून सामान्य माणसाला त्वरित दिलासा देण्यासाठी व केंद्र सरकारचा तीव्र निषेध करण्यासाठी महाविकास आघाडी तर्फे पनवेलमध्ये भव्य व धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. त्या मोर्चात हजारोंच्या संख्येने नागरिक सहभागी झाल्याने केंद्र सरकारविरुद्ध प्रक्षोभ यावेळी दिसून आला असल्याचे त्यांनी सांगितले. शिवसेनेचे बबन पाटील, शिरीष घरत यांनीही मोर्चेकऱ्यांना मार्गदर्शन केले.

शहरातील नीलकंठ दर्शन जवळील मोकळ्या भूखंडापासून सकाळी मोर्चाची सुरूवात झाली. त्यानंतर एस टी स्टॅण्ड समोरून पनवेलमध्ये प्रवेश करून लाईन आळी-आदर्श नाक्यावरून डावीकडे छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार तेथून उजवीकडून भाजीमार्केट रस्ता - टपाल नाका - महात्मा गांधी रोड कापड बाजार - जय भारत नाका - महानगरपालिका - प्रांत ऑफिस •➢ पान २ वर

खंदकामध्ये तरूण पडला

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

पोलादपूर शहरातून अंडरपासच्या खंदकातून जात असताना सर्व्हिसरोडवरून पादचारी कोसळण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. मंगळवारी रात्री चांभारगणी येथील एक तरूण तोल जाऊन अंडरपासच्या खंदकात कोसळल्यानंतर सुदैवाने अंडरपासमधील वाहतूक अद्याप सुरू झाली नसल्याने तरूण वाचला. अरुण मोरवणकर हा एसटी स्टँडकडे चालत येताना खणलेल्या अंडरपासमध्ये घसरून कोसळला. त्याला पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

खोपोलीच्या बंद डीपीसीएल कंपनीत आग

केमिकल्स ड्रम जळून खाक

। खोपोली । वार्ताहर ।

खोपोलीनजीकआत्करगांवच्या शेजारी असलेल्या बंदस्थितीतील डीपीसीएल केमिकल्स कंपनीत केमिकल्स ड्रम गोडावूनला बुधवारी (दि.१३ एप्रिल)दुपारी १ वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली.

ड्रममध्ये केमिकल्स तसेच शेजारीच गवत असल्यामुळे आगीने रौद्ररूप धारण केले होते. मात्र स्थानिक ग्रामस्थांनी दाखविलेल्या सतर्कतेमुळे घटनास्थळी पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान,अपघातग्रस्त टिमचे सदस्य पोहचल्यामुळे दोन तासांच्या शर्तीच्या प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले आहे. मागील पाच वर्षापूर्वी हा कारखाना बंद अवस्थेत आहे.मात्र याठिकाणी केमिकल्सच्या ड्रम साठा मोठ्या प्रमाणात ठेवलेला आहे. आग लागताच स्थानिक ग्रामस्थ उपसरपंच संदीप पाटील यांनी घटनास्थळी पोहचून खोपोली पोलीस ठाण्यात संपर्क केला. यावेळी सहाय्यक पोलिस निरिक्षक हरेश कळसेकर घटनास्थळी पोहचून अग्निशमन दलाला बोलवून आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. केमिकल्सच्या ड्रमला लागलेल्या आगीने रौद्ररूप •➢ पान २ वर

‘राज ठाकरेंच्या सभांमधून फुकट करमणूक’

। मुंबई । दिलीप जाधव ।

राज ठाकरे सभांमध्ये आपल्या खास स्टाईलनं भाषण करत असतात. यामध्ये लोकांची करमणूक होते त्यामुळं लोक त्यांच्या सभांना गर्दी करतात, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वोसर्वा शरद पवार यांनी खोचक टोला लगावला आहे. राज ठाकरे भाजपविरोधात का बोलत नाही असा सवालही पवार यांनी उपस्थित केला आहे.

शरद पवार हे कधी छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव घेत नाही अशी टीका राज ठाकरेंनी केली होती. या आरोपावर शरद पवारांनी उत्तर दिलं आहे. मुंबईमधील पत्रकार परिषदेमध्ये या आरोपांवर उत्तर देताना काही दिवसांपूर्वीच मी अमरावतीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल २५ मिनिटं भाषण केल्याचा दाखला पवारांनी दिला. सोनिया गांधी यांनी जेव्हा मी पंतप्रधान पदावर जाऊ इच्छित नाही, असे जाहीर केल्यानंतर तो प्रश्न तिथेच संपला होता. आमची चर्चा त्यांच्या पंतप्रधानपदाबाबत होता, तो विषय निकाली लागल्यानंतर त्यावर चर्चा करण्याचे कारण नव्हते. असे ते म्हणाले.

> राज ठाकरेंनी जाता जाता सांगितलं की त्यांचा पक्ष हा संपवणारा पक्ष आहे. ठीक आहे, ते म्हणतात ते खरं आहे. त्यांच्या संपवणाऱ्या पक्षाची महाराष्ट्रातील मतदानांनी योग्य दखल घेतली आहे. त्यामुळं त्यांना विधीमंडळात एकही जागा दिलेली नाही. यातून मतदारांनी त्यांची ओळख योग्य प्रकारे केली.
>
> – शरद पवार, राष्ट्रवादी अध्यक्ष

कोरोना पुन्हा डोक वर काढतोय?

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतात गेल्या २४ तासांत कोविड-१९ चे १,०८८ नवीन प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत, तर २६ जणांचा मृत्यू झाला आहे. सध्या देशात एकूण सक्रिय रूग्णांची संख्या १०,८७० आहे. देशात लसीकरण मोहिमेंतर्गत आतापर्यंत एकूण १५,०५,३३२ लसीकरण करण्यात आले आहेत.

दरम्यान, देशातील २९ जिल्ह्यात कोरोनाचे रुग्ण पुन्हा वाढू लागल्याने केंद्रीय आरोग्य यंत्रणेने जिल्हा प्रशासनाला सतर्कतेचे आदेश जारी केलेले आहे.

जलसंपदा मंत्र्यांनी जनतेची दिशाभूल थांबवावी

▶▶ सांबरकुंड धरणाच्या बैठकांची गिनीज बुकात नोंद होईल पण धरण होत नाही

▶▶ शेकाप नेते पंडित पाटील यांचा टोला

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

सातत्याने सांबरकुंड धरणासाठी प्रश्न लावून धरुन सुद्धा दोन दशक रखडत ठेवणाऱ्या राज्य शासनाने सांबरकुंड धरणासाठी आतापर्यंत घेतलेल्या बैठका पहाता त्याची गिनीजबुकात नोंद होईल. अर्थसंकल्पानंतर या धरणाची घोषणा करणारे जलसंपदा मंत्री जयंत पाटील त्यासाठी कुठून निधी आणणार आहेत असा सवाल करीत शेकापक्षाचे नेते पंडित पाटील यांनी जनतेची दिशाभूल थांबवा असा टोला राष्ट्रवादीला लगावला आहे.

जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी अलिबाग येथे आढावा बैठकीत सांबरकुंड धरणाची घोषणा केली. त्याचा समाचार घेताना माजी आ. पंडित पाटील बोलत होते. ते म्हणाले की, गेल्या पाच वर्षात सांबरकुंड धरणाच्या संदर्भात आपण विनिनियोजन बिलाच्या माध्यमातून राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. त्यावेळचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि जलसंपदा विभागाचे सचिव चहल यांनी स्वतंत्र बैठक सांबरकुंड धरणाच्या संदर्भात लावली. त्यावेळेला भुसंपादनासाठी ५० कोटी रुपयांची तरतूद केली. सांबरकुंड धरण अलिबाग तालुक्यातील महत्वाचे धरण आहे. आमचे नेते स्व.दत्ता पाटील यांच्या आमदारकीपासून त्यांची सातत्याने मागणी होती. माजी मंत्री मीनाक्षी पाटील, आ. जयंत पाटील यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडल्या. अनेक सूचना झाल्या. सांबरकुंड धरण प्रकल्प हा एकमवे प्रकल्प आहे. की त्याची विधान मंडळात चर्चा होऊन देखील तो प्रकल्पच पुढे जात नाही. मागील वेळी आ. जयंत पाटील यांनी बँकेमार्फत देखील या धरणासाठी निधी देण्याची तयारी दाखवली होती. मात्र तत्कालिन मंत्री अजितदादा •➢ पान २ वर

•➢ पान २ वर

अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१४ एप्रिल

१)श्री. जालीन्दर फकीरा सदाफुले,
श्रीबाग-२, अलिबाग
१४ एप्रिल १९५०

२) श्री. दत्तात्रेय बाल्या पेरेकर,
खंडोबा मंदिराजवळ,
अलिबाग, कोळीवाडा
१४ एप्रिल १९४९

आंबेडकर जयंतीनिमित्त भीमगीतांनी आदरांजली

नवी मुंबई : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंती महोत्सावानिमित्त सामाजिक न्याय विभागामार्फत गुरुवारी १४ एप्रिलला सकाळी १० वा. मंत्रालयासमोरील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभगृहात प्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या स्वरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्री धनंजय मुंडे, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री जयंत पाटील, आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

वाराणसीमध्ये भाजप पराभूत

लखनऊ : विधानसभा निवडणुकीत पुन्हा सत्तेवर आल्यानंतर महिनाभरातच भाजपने विधान परिषद निवडणुकीतही मोठा विजय मिळवला आहे. मात्र वाराणसीत भाजपला धक्का बसला आहे. तिथे भाजप उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर राहिला. भाजपने जाहीर २७ जागांपैकी २२ ठिकाणी विजय मिळवला आहे, तर ९ जागा त्यांच्या यापूर्वीच बिनविरोध आल्या आहेत.

जनतेच्या अपेक्षा समजण्यासाठी संवाद यात्रा

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे प्रतिपादन

। माणगाव । प्रतिनिधी ।

राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत सहभागी आहे त्यामुळे जनतेच्या, कार्यकर्त्यांच्या मनात पक्षाकडून काय अपेक्षा आहेत हे जाणून घेण्यासाठी राज्यभरात संवाद यात्रा सुरु केली असल्याचे प्रतिपादन प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बुधवारी (१३ एप्रिल) माणगाव येथे केले.

माणगाव गांधी मेमोरियल हॉल याठिकाणी संवाद राष्ट्रवादी परिवाराचा जनतेच्या हिताचा हे ब्रीदवाक्य घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे बुधवार दि.१३ एप्रिल २०२२ रोजी परिवार संवाद यात्रेचे आयोजन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते.

यावेळी ना. पाटील यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधून श्रीवर्धन विधानसभा मतदार संघातील माणगाव, रोहा, तळा, म्हसळा, श्रीवर्धन या पाचही तालुक्यांचा पक्ष वाढीच्या दृष्टीने आढावा घेतला. यावेळी खा. सुनील तटकरे, पालकमंत्री अदिती तटकरे, आ. अनिकेत तटकरे, युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, प्रदेश युवती जिल्हाध्यक्ष सक्षणा सलगर, प्रदेश महिला सरचिटणीस दीपिका चिपळूणकर, प्रदेश महिला निरीक्षक रुपाली दाभणे यांच्यासह पक्षाचे नेते,कार्यकर्ते उपस्थित होते.

जयंत पाटील यांनी सुरुवातीला अदिती तटकरे यांचे कौतुक केले. महाराष्ट्रामध्ये पक्ष सत्तेवर आल्यानंतर आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या पक्षाकडून काय अपेक्षा आहेत आणि आम्ही सरकारमध्ये आम्ही बसलेलो आहोत त्या सरकारकडून आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या काय अपेक्षा आहेत हे समजून घेण्यासाठी महाराष्ट्रभर आम्ही गेली काही महिनाभर फिरत होतो. आज अशी हि आमची परिवार संवाद यात्रा गडचिरोली जिल्ह्याच्या अहेरी तालुक्यापासून सुरु झालेली ती आज माणगाव तालुक्यात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आपण सगळे अनेक वर्ष काम करणारे नेते, कार्यकर्ते आहात. तुमचं म्हणणं काय आहे? ते समजून घ्यावं यासाठी ही परिवार संवाद यात्रा असल्याचे सांगितले. खा.तटकरे यांनीही आमचा जनतेशी संपर्क आहे. त्यातूनच मोठ्या प्रमाणात विकासकामे करण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. श्रीवर्धन मतदारसंघात ३४७ मतदान केंद्रे असून प्रत्येक ठिकाणी बूथ कमिट्या स्थापन करणे आवश्यक असून त्यातून जनतेचे आणखी काही प्रश्न मार्गी लागतील असेही त्यांनी सांगितले.

राज ठाकरेंची उतारा सभा

। पाली/बेणसे । प्रतिनिधी।

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची मंगळवारी ठाण्यात उत्तरसभा पार पडली. राज ठाकरे यांनी या सभेत राष्ट्रवादीच्या नेत्यांवर जोरदार टीका केली. तसेच राज ठाकरेंनी यावेळी जयंत पाटील यांची नक्कल करत टीका केली. जयंत पाटील यांना जंत पाटील म्हटले. त्यावर आता जयंत पाटील यांनी राज ठाकरेंना प्रत्युत्तर दिलं आहे. यावेळी जयंत पाटील म्हणाले की, राज ठाकरेंची कालची सभा ही उतारा सभा होती. तसेच राज ठाकरे बालमोहन विद्यामंदिरचे विद्यार्थी आहेत. त्यामुळे त्यांचं मराठी व्याकरण पक्क आहे. तरी देखील बालमोहनच्या विद्यार्थीने अशी चूक केली असल्यामुळे राज ठाकरे यांना पुन्हा व्याकरण शिकविण्याची गरज आहे. अशी खरमरीत टीका प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली आहे.

कोकण भवन येथे व्याख्यान

नवी मुंबई :महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त सामाजिक समता कार्यक्रमांतर्गत भारताचे संविधान आणि भारतीय नागरिकांचे कर्तव्य या विषयावर सामाजिक कृतज्ञता निधीचे कार्याध्यक्ष सुभाष वारे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दि. १९ एप्रिल २०२२ रोजी समिती सभागृह, १ ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे दुपारी ३.३० वाजता होणार आहे. कोकण विभागातील अधिकारी, कर्मचारी, पत्रकार यांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक न्याय विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे, कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ.गणेश मुळे आणि राजपत्रित अधिकारी महासंघ कोकण विभाग शाखेचे सचिव डॉ. गणेश धुमाळ यांनी केले आहे.

संगणक परिचालकांचे शिवतीर्थावर ठिय्या आंदोलन

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

जिल्ह्यातील ग्रामपंचायतीमध्ये काम करणाऱ्या संगणक परिचालकांच्या मानधनाबाबत इन्व्हाईस क्लेमची लावलेली जाचक अट परिचालकांसाठी डोकेदुखी बनली आहे. याबाबत अनेकवेळा सांगूनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील संगणक परिचालकांनी बुधवारी दुपारी जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वारातच बसून ठिय्या आंदोलन करीत निषेध व्यक्त केला. महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटना रायगड जिल्हा अध्यक्ष मयुर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन पुकारण्यात आले. या आंदोलनात

सचिव निवेदिता चवरकर, सर्वेश रसाळ, आदी पदाधिकाऱ्यांसह २७५ संगणक परिचालक सहभागी झाले होते.

ग्रामपंचायत मधील आपले सरकार सेवा केंद्र मध्ये काम करणाऱ्या संगणक परीचालकांवर सीएससी - एसपीव्ही या कंपनीकडून वेळोवेळी अन्याय होत असल्याचा आरोप संगणक परिचालकांनी केली आहे. शासनाच्या योजनांचे काम प्रामाणिकपणे करून देखील संगणक परिचालकांना त्यांच्या कामाचा मोबदला देखील वेळेत मिळत नाही. गेल्या तीन महिन्यांपासून या परिचालकांना मानधन मिळाले नाही. जे मानधन मिळते त्यासाठी दर महिन्याला त्यांना जे इन्व्हाईस क्लेम करावे लागत आहे. त्यासाठी कंपनीकडून जाचक अट लावली आहे. त्यामुळे संगणक परिचालकांना हक्काच्या मानधनाला मुकावे लागण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे रायगड जिल्हयातील ग्रामपंचायतीमध्ये काम करणाऱ्या संगणक परिचालकांनी बुधवारी अलिबाग येथील जिल्हा परिषदेच्या कार्यालयात घुसून ठिया आंदोलन सुरु केले आहे. इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर सर्व परिचालकांनी ठिय्या आंदोलन करण्यात सुरुवात केली आहे.

शकुंतला जाधव यांचे निधन

। ठाणे । प्रतिनिधी।

ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाचे जिल्हा माहिती अधिकारी अजय जाधव यांच्या

मातोश्री शकुंतला जाधव (वय ७९) यांचे बुधवारी (१३ एप्रिल) निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर पनवेल येथील रुग्णालयात उपचार सुरु होते. त्यांच्यावर मालेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

पान १ वरुन

वरसोलीत स्तंभ होणार

त्रासदायक झाला आहे. कोणताही दिशादर्शक मार्गदर्शक स्तंभ येथे नसल्याने धोका लक्षात येत नाही. त्यामुळे आतापर्यंत दोन नौकांना येथे जलसमाधी मिळाली आहे. त्यामुळे वरसोली खाडी मुखाजवळ मार्गदर्शक स्तंभाच्या रिंग बोयाची उभारणी करण्यात यावी अशी मागणी कोळी समाजाने वारंवार करुन देखील शासन त्याकडे डोळेझाक करीत होते. शेवटी वरसोली कोळीवाडा येथे कोळी समाजाचे पाटील, पंच तसेच नाखवा संघाचे चेअरमन विविधी सोसायटीचे चेअरमन, खंडोबा देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष, मार्तंड देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष अशा सर्वांनी एकत्र होत वरसोली ग्रामपंचायत सदस्य सुरेश घरत यांच्या सहकार्याने शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांना साकडे घालीत अन्याय निवारण्याची मागणी केली होती. त्यावेळी आ. जयंत पाटील यांनी झालेल्या अपघातामुळे पाय जायबंदी असताना देखील व्हीलचेअरवर बसून बंधाऱ्याच्या झालेल्या नुकसानीची पहाणी करुन त्वरित संदर्भित अधिकारी वर्गासोबत प्रत्यक्ष बोलणी करून पंचनामा करून घेण्याचे निर्देश देत सर्व कोळीबांधवांना सहकार्य करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आ. जयंत पाटील यांनी बंदरे विभागाला या संदर्भात पत्र देत तातडीने सदर बंधाऱ्याची दुरुस्ती आणि वरसोली खाडी मुखाजवळ मार्गदर्शक स्तंभाची उभारणी करण्याची मागणी केली. धुप प्रतिबंधक बंधाऱ्यापासून २०० मीटर अंतरावर चाळमळा येथे खाडीमुखाजवळ मार्गदर्शक स्तंभाची उभारणी करण्याचे काम सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये राज्य शासनाच्या लेखाशिर्ष क्र. ३०५११८३५ (तरंगती जेट्टी व तत्सम प्रवाशी सुविधा उभारणे) या योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आले होते. सदर कामाचे १.५० कोटी इतक्या किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यासाठी लागणारी प्रशासकीय मान्यता मिळवून आता निविदा प्रक्रीयेला देखील सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे सदर काम लवकरच मार्गी लागून प्रत्यक्षा या रिंग बोयाच्या उभारणीला सुरुवात होणार असल्याने वरसोली येथील कोळी समाजाने समाधान व्यक्त करीत आ. जयंत पाटील यांना धन्यवाद दिले आहेत. यावेळी मार्तंड विकास सहकारी संस्था, वरसोलीचे चेअरमन धर्मा घारबट, व्हाईस चेअरमन प्रभाकर पाटील, मार्तंड मच्छिमार नाखवा संघाचे चेअरमन दत्ताराम घारबट, व्हाईच चेअरमन शेखर बना, जय मल्हार मच्छिमार नाखवा संघाचे चेअरमन परशुराम दांडेकर, व्हाईस चेअरमन महेश कोळी यांच्यासह गावकीचे पाटील, पंच आणि ग्रामस्थांनी धन्यवाद देत समाधान व्यक्त केले आहे.

बसची धडक

जाणारी एसटीची निम आराम बस यांच्यात समोरासमोर टक्कर झाली. यामध्ये दोन्ही बसमधील १९ व्यक्ती जखमी झाल्या आहेत. यामध्ये जेएसडब्ल्यूच्या चालकासह १० जण तर एसटीमधील चालकासह ९ जण जखमी झाले आहेत. अपघाताचे वृत्त कळताच रेवदंडा पोलीस तातडीने घटनास्थळी पोहचून ग्रामस्थांच्या मदतीने जखमींना बाहेर काढून रुग्णालयात दाखल करत होते. त्यांना अलिबाग येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अधिक उपचारासाठी आवश्यक असेल त्यांना जेएसडब्ल्यू कंपनीच्या रुग्णालयात हलविण्यात येणार आहे. प्रकरणाचा अधिक तपास रेवदंडा पोलीस करीत आहेत.

मविआचा मोर्चा

असा धडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी पनवेल-उरण महाविकास आघाडीचे अध्यक्ष बबनदादा पाटील, आमदार बाळाराम पाटील, राष्ट्रवादीचे सरचिटणीस तथा महाविकास आघाडीचे सचिव सुदाम पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, पनवेल जिल्हाप्रमुख शिरीष घरत, काँग्रेसचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, जेष्ठ नेते जी.आर.पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रशांत पाटील, सतीश पाटील, माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, शिवसेना पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, शेकापचे विधानसभा अध्यक्ष काशीनाथ पाटील, मनपा विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेवक गणेश कडू, रामदास पाटील, रामदास शेवाळे आदींसह महाविकास आघाडीचे नेते आणि हजारो कार्यकर्त्यांच्या प्रमुख उपस्थिती मोर्चा पडला.

कंपनीत आग

धारण केल्यामुळे इतर पाच अग्निशमन दलांना बोलविण्यात आले होते. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी तहसिलदार आयुब तांबोली पोहचून मदतकार्य उपलब्ध करण्यासाठी सहकार्य केले.गावातील ग्रामस्थ मनोज देवकर,विलास मते,हेमंत पाटील, गणेश देवकर,उल्हास तवळे,हरिश शिंदे यांच्यासह खोपोली नगरपालिकेचे अग्निशमन दलाचे मोहन मोरे आणि टिम,अपघातग्रस्त टिमचे सदस्य गुरूनाथ साठेलकर यांची उपस्थित होत मदतकार्य केले आहे.

कारखाने बंद केल्यावर घातक आणि ज्वलनशील केमिकल्स न ठेवता हलविले पाहिजे मात्र कंपनी मालकाने केमिकल्सचे ड्रम ठेवल्यामुळेच आग लागली आहे.त्यामुळे बंद कंपनीतील असे केमिकल्स तातडीने बाहेर काढावा अन्यथा आमच्या गावाजवळ मोठा अनर्थ घडू शकतो अशी भिती ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत, असे माजी उपसरपंच संदीप पाटील यांनी म्हटले आहे.

दिशाभूल थांबवावी

पवार यांनी त्याला मान्यता दिली नाही.

पाऊस कोकणात आणि पाटबंधारे प्रकल्प पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात. त्यामुळे सातत्याने कोकणावर अन्याय होत आहे. आज जे दोन प्रकल्प कोंढाणे आणि बाळगंगा झाले. त्यांचे ८० ते ९० टक्के काम पूर्ण झाले असून १० ते २० टक्केच काम बाकी आहे. मुरुड तालुक्यातील खारअंबोली धरण बांधून दोन चार वर्षे पूर्ण झाले. मात्र त्याला जोडणारे कालवे अजूनही काढण्यात आलेले नाहीत. या संदर्भात आपण आमदार असताना अनेक वेळा शासनाचे सभागृहात लक्ष वेधले. त्यावेळी त्यांनी आम्हाला आश्वासीत केले होते की पाईपद्वारे डिझाईन बदलले आहे. म्हणजे धरणे बांधायची मग त्याचा शेतकऱ्यांना काहीच लाभ होत नसेल तर उपयोग काय असा प्रश्न देखील पंडीत पाटील यांनी केला आहे.

इथे जिल्हास्तरावर बैठका घ्यायच्या आणि विचारायचे की, किती निधी पाहिजे हे हास्यास्पद आहे. विद्यमान सरकार येऊन अडीच पावणे तीन वर्षे झाली पण कोकणातील प्रकल्पांची चेष्टा केली जात आहे. पोलादपूर मध्ये देवळाली धरण, कोंढीवली धरण आहे ते लिकेज झाले आहेत. कोकणातील अनेक धरणे अतिवृष्टीमुळे वाहून गेली, नादुरुस्त झालेली आहेत. पण त्यासाठी राज्य शासन निधी देत नाही. अगोदरच्या सरकारकडे आपण मागणी केली होती. आता सरकार बदलले पण परिस्थिती तीच कायम आहे. आज माणगावमधील काळ प्रकल्पाच्या कालव्यातील दुरुस्ती नाही. म्हणजे धरणे बांधून आहेत. पण कालव्याला निधी नसल्यामुळे शेतीला पाणी जात नाही. बॅ अंतुले मुख्यमंत्री असताना आंबेतपर्यंत कालवा नेला होता. मात्र आज तो नादुरुस्त आहे. त्यामुळे कोकणातील आणि रायगड जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाद्वारे किती दिवस चेष्टा होणार आहे असा सवालही पाटील यांनी केला आहे.

सारळ घोल प्रकल्प झाला तर खारेपाटातील पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. राज्य शासन जाणीवपूर्वक अलिबागकडे दुर्लक्ष करीत आहे असा प्रश्न पडला आहे. समोर समुद्र दिसत असतानाही पाणी टंचाईचा सातत्याने सामना करणाऱ्या ग्रामस्थांची सांबरकुंड धरण झाले तर पाणीटंचाई दूर होईल. मग शासन का हे प्रकल्प मार्गी लावत नाही. हेटवण्याचे अधिक्षक अभियंता, इंजिनियर नक्की कसला पगार घेतात. आपल्या खात्याचे मंत्री आल्यावर त्यांना परिपूर्ण माहिती दिली जात नाही. सातत्याने महाराष्ट्र सरकार कोणाचेही आले तरी मंत्री पश्चिम महाराष्ट्राचे असतात, खानदेशातले असतात नेहमीप्रमाणे अर्थसंकल्प मांडल्यानंतर बजेट झाले. त्यानंतर घोषणा करुन त्यासाठी बजेट कुठून आणणार. त्यामुळे जनतेची दिशाभूल का करता असा संतप्त जाब देखील त्यांनी केला आहे.

ही आढावा बैठक जर अर्थसंकल्पापूर्वी झाली असती तर आम्ही समजु शकलो असतो. पण राज्य सरकारने आम्ही आमदार असताना विनिनियोजन बिल हे महत्वाचे बिल असताना ही बैठक लावून शासनाने त्यावेळी निर्देश दिले होते त्याचे काय झाले. आज कोकणातील २२ हजार हेक्टर क्षेत्र नापिक आहे. कासव देखील जास्त गतीने चालतो पण त्यापेक्षा मंद गतीने चालणारे पाटंबधारे खाते आहे. अशा बैठका किती घ्यायच्या गिनीजबुकात जागतिक विक्रम होईल एवढी चर्चा सांबरकुंड धरणाव्यतिरिक्ति कुठल्याचे धरणाची झाली नसेल. प्रत्यक्षात कारवाई काहीच नाही दहा बारा वर्षापूर्वी हे धरण झाले असते तर कमी खर्चात झाले असते पण आता महागाई वाढल्यामुळे त्याचा खर्च देखील वाढली आहे. त्यामुळे राज्यशासनाने जनतेची दिशाभुल न करता कोकणातील अन्याय बंद करुन ठोस कारवाई करण्याची मागणी माजी आमदार पंडीत पाटील यांनी केलेली आहे.

प्रोसेस फी जमा . रु.५०/-

अर्जदाराचे वकीलः **ॲड.सचिन किशोर पाटील**

जाहिर नोटीस

माणगाव येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात

दिवाणी चौ.अर्ज क्र.२०/२०२२
निशाणी क्र.०८/ड
ने.ता.१२/४/२२

१) श्री. चंद्रकांत दत्ताराम कोलते, वय ६० वर्षे, व्यवसाय-शेती
२) श्री.सिताराम दत्ताराम कोलते, वय ४९ वर्ष, व्यवसाय-शेती, वर नं.१ व २ रा.मु.येलवडे, पा.शिरवली, ता.माणगांव, जि.रायगड
३) श्रीमती सुलभा सुरेश वळंजू, वय ५१ वर्षे, व्यवसाय - शेती, रा.मु.पो.वाकवी - बुद्रुक ता.महाड, जि.रायगड
४) श्रीमती सरिता सुनिल ढवण, वय ५२ वर्षे, व्यवसाय - शेती, रा.वळण खुर्द, ता.महाड, जि.रायगड
५) श्रीमती सुविधा संजय कोलगे, वय ४५ वर्ष, व्यवसाय-शेती, रा.मु.घामनी, पो. बोरवाडी ता.माणगांव, जि.रायगड
६) श्रीमती स्वाती संजय कोकाटे, वय ४५ वर्षे, व्यवसाय - शेती, रा.मु.तेलंगें, ता. महाड, जि.रायगड

अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सा.वाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येते की, कै.दत्ताराम पांडुरंग कोलते दि.०९/०८/२००८ रोजी व कै.मालती दत्ताराम कोलते ह्या दि. १२/११/२०१५ रोजी आजारपणामुळे मौजे येलवडे ता.माणगांव, जि. रायगड येथे निधन झाले आहे. त्यामुळे त्यांचे कायदेशीर वारस श्री. चंद्रकांत दत्ताराम कोलते, वगैरे ५ यांनी माणगाव येथील मे.दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सो. यांचे कोर्टात कै. दत्ताराम पांडुरंग कोलते यांच्या मृत्यूपश्चात महसूल दप्तरी वारसनोंद होण्याकरिता व अर्जातील अर्ज कलम ४ मध्ये नमूद केलेल्या कारणांकरीता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट नुसार वारस दाखला मिळण्याकरिता दिवाणी चौ.अर्ज क्र.२०/२०२२ चा अर्ज दाखल केलेला आहे. सदरचे अर्जास कोणाला हरकत घेणेची असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत वर नचमूद मा.कोर्टात हजर राहून आपली हरकत द्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यांत येते की, वर नमूद कालावधीत योग्य त्या हरकती घेतल्या गेल्या नाहीत तर मा. कोर्टात वरील अर्जदार यांच्या अर्जाच्या अनुषंगाने पुरावा घेण्यांत येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यांत येईल व अर्जदार हे कै.दत्ताराम पांडुरंग कोलते यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास त्यांना वारस दाखला देण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक १२/०४/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली आहे.

सही/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, क.स्तर, रायगड-माणगाव

कोर्टाचा शिक्का

सही/- **अधिक्षक** दिवाणी न्यायालय, क.स्तर, रायगड-माणगाव

प्रो.जमा रु... / / २०२१

अर्जदाराचे वकीलः श्री.प्रकाश धर्मा जमदाडे
फौ.चौ.अर्ज नं.८९/२०२१
निशाणी क्र.

रोहा येथिल मे. प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी सो. यांचे कोर्टात

श्रीमती भारती साधुराम थिटे, वय : ३७ वर्षे, धंदा-गृहिणी, राहणार-मु.देवकान्हे, तालुका-रोहा, जिल्हा-रायगड — अर्जदार

विरूद्ध

निबंधक जन्म मृत्यू विवाह नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत -देवकान्हे तालुका-रोहा, जिल्हा-रायगड वगैरे-१ — सामनेवाले

ज्याअर्थी अर्जदार श्रीमती भारती साधुराम थिटे हिचे सासरे कै.सिताराम रामजी थिटे यांचा मृत्यू दिनांक ३१/०३/२००९ रोजी मु.देवकान्हे, तालुका -रोहा, जिल्हा-रायगड येथे झाला आहे. परंतु त्यांचे मृत्यूची नोंद महाराष्ट्र शासनाने जन्म आणि मृत्यू अधिनियम अधिनियम १९६९ च्या कलम १७ अन्वये नियुक्त केलेले नोंदणी निबंधक अधिकारी यांचे कार्यालयात रजिस्टर मध्ये नोंद झाल्याचे आढळून येत नाही. सबब कायद्याच्या तरतुदी प्रमाणे मृत्यूची नोंद जन्म/मृत्यू रजिस्टर मध्ये होणे करिता आदेश मिळणेकामी या मे.रोहा न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सबब सदरचे जन्म/मृत्यूची नोंद/मृत्यू रजिस्टरमध्ये नोंद होणेसंबंधात कोणाही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आंत या न्यायालयात लेखी कागदपत्रासह सादर कराव्यात, मुदतीत हरकती न आल्यास, कोणतीही हरकत नाही असे समजून, अर्जदार यांना दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १०/६/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- **कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय क.स्तर रोहा

कोर्टाचा शिक्का

सही/- **अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर रोहा रोहा

अर्जदाराचे वकील
पी.डी. जमदाडे
दिवाणी चौ.अर्ज नं. ३०/२०२१
निशाणी क्र. ०८/ड

रोहा येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात,

१) किशोरी नवीनचंद्र सोष्टे, वय : ६५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी, आधारकार्ड क्र. ६८९१ ४४१७ १७५८
२) सिद्धार्थ नवीन उर्फ नवीनचंद्र सोष्टे, वय : ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी, आधारकार्ड क्र. २६९८ ८४०६ ८१६१
३) केतन नवीनचंद्र सोष्टे, वय : ३५ वर्षे, व्यवसाय- व्यापार, आधारकार्ड क्र. ७९८३ ०४९८ २१८७
तिघेही रा. बंगळे आळी, मु.पो. नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड — **अर्जदार**

विरुद्ध

कोणीही नाही — **सामनेवाले**

अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील कै. नवीनचंद्र उर्फ नवीन नारायण सोष्टे यांचे जिल्हा रुग्णालय-अलिबाग, जि. रायगड येथे दि. २२ जुलै २०२१ रोजी मयत झाले असून, त्यांचे पश्चात अर्जदार नं. १ ही पत्नी व अर्जदार नं. २ व ३ ही मुले असे हयात वारस म्हणून असून, त्यास अन्य कोणीही वारस नाहीत यास्तव वारस दाखला मिळणे करीता अर्जदार यांनी या मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जदार यांनी मे. न्यायालयात वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सबब सदरचे वारसपत्र वरील अर्जदार यांना देण्यासंबंधी कोणाही इसमांची कोणत्याही प्रकारे हरकती असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत या न्यायालयात लेखी कागदपत्रासह सादर कराव्यात, मुदतीत हरकती न आल्यास, कोणतीही हरकत नाही असे समजून, अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि. २०/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- **कनिष्ठ लिपिक** दिवाणी न्यायालय क. स्तर, रोहा

कोर्टाचा शिक्का

सही/- **सहा. अधीक्षक** दिवाणी न्यायालय क. स्तर, रोहा

जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे वनवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची भातशेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. शशिकांत काशिनाथ राऊत व सौ. शिल्पा शार्दुल पाटील पूर्वाश्रमीची शिल्पा शशिकांत राऊत यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाचा साठेकरार संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान स्वाक्षरीत झालेला आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहीत असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पैसे)
मौजे वनवली, ता. अलिबाग जि. रायगड	५५/२	00-७३-00 पो.ख. 00-०२-00 00-७५-00	१७.७०

वरील एकूण मिळकतीपैकी श्री. शशिकांत काशिनाथ राऊत व सौ. शिल्पा शार्दूल पाटील पूर्वाश्रमीची शिल्पा शशिकांत राऊत यांचे मालकीची 0-२0-00 हे.आर. क्षेत्राची मिळकत

अलिबाग
दि. १३/०४/२०२२

सही/-
ॲड. महेश सुहास म्हात्रे
M.M. Legal Adviser & Property Consultant
रितूराज प्लाझा, तळमजला, ऑफीस नं. १
शिवाजी चौक, अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ०९८५००४२२३४

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

WORK FROM HOME 8975956964

बोअरवेल-विहिरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन- ९२२६७६६१२९, ९३७०५१७९४९

शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्व जातीय वधूवरांची नोंदणी. ४२ शाखा व वेबसाईटवर- ९२२६७६६१२९, ९३७०५१७९४९

अलिबाग चोंढी येथे कामासाठी माणसे पाहिजेत. फोन नं.८२०८४५९४२४

सहाण बायपास येथे रोडटच जागा भाड्याने देणे आहे. ९८२३९८६७४५/८६५५३७०५४१

अलिबाग-चोंढी येथे सलून (ब्युटी पार्लर) कामासाठी अनुभवी मुले-मुली पाहिजेत. मो.९९२१०७३९६३.

हॉस्पिटल मध्ये काम करण्यास हवे आहेत. १.नर्स ANM/GNM २.नर्स PRIVATE NURSING COURSE ३.मुले/मुली १२ वी पास ४.X- RAY साठी मुले ५.मावशी आयाबाई आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र आणावे अंजली हॉस्पिटल अलिबाग - ७७४५०५००२५

Expericenced MEDIVISION operator required.ShouldalsoknowADVANCE E X C E IWorking Hours : 9.30 to 6.30 Starting salary: 7000/- Contact : 9372211263

अलिबाग परिसरामध्ये २ ते ४ गुंठे स्वतंत्र उतारा असलेला एन.ए.प्लॉट त्वरीत विकत घेणे आह

पूरनियंत्रणांच्या उपायांकडे शासनाचे दुर्लक्ष

व्यापाऱ्यांचा १५ एप्रिलला रस्ता रोको

। महाड । प्रतिनिधी ।

महाड शहर आणि तालुक्यात आलेल्या विध्वंशक महापुरा नंतर सर्वसामान्य नागरिकांसह शहरातील व्यापारी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला, भविष्यात पुन्हा हा असा प्रलयंकारी महापूर येऊ नये यासाठी शासनाने ठोस उपाय योजावेत, अशी मागणी महाडमधील समस्त व्यापारी आणि नागरिकांनी स्थापन केलेल्या महाडपूर निवारण समितीच्या या माध्यमातून करण्यात आली.

पावसाळ्याला काही दिवस राहिले असल्याने शासनाने त्वरित कार्यवाही केली नाही तर, १५ एप्रिलला मुंबई-गोवा महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल. असा इशारा महाडपूर निवारण समितीने दिला आहे. दरवर्षी सावित्री, गांधारी आणि काळ या नद्यां दुथडी भरून वाहतात. नदीकिनारी असलेल्या अनेक गावातून पुराचे पाणी शिरते. २२ जुलै २०२२ रोजी आलेल्या महापूराने संपूर्ण महाड तालुका उद्ध्वस्त केला. २५ आणि २६ जुलै २००५ रोजी आलेल्या महापूराची पातळी कमी होती. त्यामुळे महाडकर नागरिक २००५ च्या पुराची पातळी समजून सावध होते. परंतु २०२१ मध्ये आलेल्या पुराच्या पाण्याची पातळी सुमारे आठ ते दहा फूट वाढल्याने नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले. पुन्हा महापुरामुळे नुकसान होऊ नये यासाठी महाड पूरनियंत्रण समितीने शासनाकडे पूर नियंत्रण होण्यासाठी कायमस्वरूपी उपाय योजावेत अशी मागणी केली होती.

महाडपूर नियंत्रण समितीचे अध्यक्ष डॉक्टर समीर बुटाला यांच्या अध्यक्षतेखाली पूरावर नियंत्रण कशाप्रकारे राहता येईल व त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना कोणत्या करण्यात याव्यात याबाबत सविस्तर माहिती घेतली. सावित्री गांधारी व काळ या तीनही नद्यांची पाहणी करून त्याबाबत शासनाला काही सूचना केल्या याबाबत खा. सुनील तटकरे, पालक मंत्री अदिती तटकरे, महाडचे आ. भरत गोगावले यांच्याकडे चर्चा करून शासनाने पावसाळा सुरू होण्यापूर्वी योग्य ते उपाय योजण्याची विनंती केली. पावसाळ्याला काही दिवस राहिले असून जून जुलै मध्ये कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे शहरामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शासनाने तातडीने पुर नियंत्रणाचे योग्य ते उपाय करावेत अशी मागणी वारंवार करूनही दुर्लक्ष केले जात आहे. बाबत सर्व लोकप्रतिनिधी जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार, यांनी स्थानिक पातळीवर सातत्याने पाठपुरावा घेतला पण या संबंधित खात्याने याबाबत कार्यवाही करणे अपेक्षित होते, परंतु संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष करण्यात आले. सरकारी अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे आणि बेजबाबदारपणामुळे पूर निवारणाची कामे अद्याप पूर्ण झाली नाहीत आणि त्यामुळेच २०२१ मध्ये उद्भवलेल्या भयानक परिस्थितीला पुन्हा सामोरे जाण्याची वेळ येणार आहे.

मच्छिमारांना मदतीचे आश्वासन

। अलिबाग । वार्ताहर ।

जिल्ह्यातील थळ व नवगाव येथील आरसीएफ बाधित मच्छिमार बांधवांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात १२ एप्रिल रोजी कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व भाजपाचे विधान परिषदेचे आ. रमेश पाटील यांच्या निवासस्थानी आरसीएफचे महाप्रबंधक श्रीनिवास कुलकर्णी, संजीव हरळीकर, धनंजय खामकर यांच्यासोबत बैठक पार पडली. यावेळी ॲड. चेतन पाटील व प्रकल्प बाधित मच्छिमार बांधव उपस्थित होते.

गेल्या ३५ ते ४० वर्षापासून आर.सी.एफमध्ये बाधित स्थानिक मच्छिमार बांधव मूलभूत सुविधा उपलब्ध होण्यासाठी संघर्ष करीत आहेत. कंपनीकडून मच्छिमार बांधवांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परंतु आजपर्यंत या आश्वासनाची पूर्तता झाली नसल्यामुळे मच्छिमार बांधवांचे नुकसान होत आहे. यामुळे गेल्या आठवड्यात आ. पाटील व शिष्टमंडळाने केंद्रीय रसायन व खत मंत्री भगवंत खुबा यांची दिल्ली येथे भेट घेऊन मच्छिमार बांधवांना न्याय देण्याची मागणी केली होती.

या बैठकीमध्ये मच्छिमार बांधवांना वीज, पाणी, रस्ते या सुविधा येत्या दोन महिन्यात उपलब्ध करून दिल्या जातील. तसेच आऊट फॉल चॅनेल केंद्र सरकार, राज्य सरकार व आरसीएफ एकत्रित निधी उपलब्ध करून लवकरच बांधण्यात येईल, असे आरसीएफ अधिकाऱ्यांनी सांगितले.

महत्त्वाचे

वीज कर्मचाऱ्याला वाचविण्यात यश

। खोपोली । प्रतिनिधी ।

पेण -खोपोली रस्त्याच्या बाजूला वावोशी फाट्यावर विद्युत खांबावर काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांचे पाय अडकल्याची घटना १२ एप्रिल रोजी दुपारी १ वाजण्याच्या दरम्यान घडली. घटनास्थळी तातडीने जेसीबी मशीन उपलब्ध झाल्यामुळे कर्मचाऱ्याला सुखरूप खाली उतरवण्यास यश आले. पेण-खोपोली रस्त्याच्या बाजूलाच वावोशी फाट्यावर विद्युत वाहिनी दुरूस्तीचे काम करण्यासाठी हिरामन पाटील (वय -५०, रा-पेण) हे कर्मचारी चढले. काम करीत असतानाच पाय अडकल्यावर ते ओरडू लागला असता सोबत असणारे कर्मचारी आणि ठेकेदार अल्पेश शहा यांच्या लक्षात आले. त्याने तातडीने मदत कार्य सुरू केले. यावेळी मनिष खवळे यांनी घटनास्थळी थांबून सहकार्य केले. कर्मचारी सुखरूप खाली उतरवण्याचे प्रयत्न सुरू असतानाच बॉम्बे पेपर मिल कंपनीने जेसीबी उपलब्ध करून दिला. वीज कर्मचारी कर्तव्य करताना त्यांना होणाऱ्या त्रास मनोमन ओळखून योग्य वेळी मदत केली.

तीन अपत्य असूनही अंगणवाडी सेविका सेवेत?

। रोहा । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील सरफळेवाडी येथील मिनी अंगणवाडी सेविका गिता उर्फ रश्मी रामदास सरफळे यांना तीन अपत्य असल्याने त्यांना अंगणवाडी सेविका या पदावरून कमी करण्यात यावे, या मागणीसाठी एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी रोहा यांच्याकडे तसेच वरिष्ठ कार्यालयात तक्रार दाखल करण्यात आली होती. पण आजही संबंधित अंगणवाडी सेविका आपल्या पदावर कार्यरत असल्याने या अंगणवाडी सेविकेला नक्की कोणाचा वरदहस्त आहे असा सवाल उपस्थित केला जात आहे.

संबंधित अंगणवाडी सेविकेचे पती जामगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच होते व त्यांनी देखील तिसरे अपत्य जन्माला आल्यानंतर सरपंचपदाचा काही काळ उपभोग घेतल्याची माहिती देखील स्थानिकांनी दिली आहे. आपल्या तक्रारीच्या पुष्ट्यर्थ तक्रारदार यांनी सरफळे यांच्या तीनही अपत्यांचे जन्म दाखले तक्रार अर्जासोबत सादर केले होते.संबंधित अंगणवाडी सेविकेला १०/१२/२००८ रोजी प्रथम तर २३/१०/२०१० रोजी दुसरे अपत्य झाले होते. त्यानंतर १४/०२/२०१७ रोजी तिसरे अपत्य झाल्याने तक्रारदार यांनी दिनांक २९/०८/२०१९ रोजी तक्रार करून देखील केवळ चौकशीचा फार्स करण्यात आला.

संबंधित अंगणवाडी सेविका आज देखील कामावर कार्यरत असल्याने शासनाची फसवणूक केल्याचे दिसून येत आहे. तिसरे अपत्य झाल्यानंतर संबंधित अंगणवाडी सेविकेने स्वतःहून राजीनामा देणे गरजेचे होते. पण सदर बाब प्रशासनापासून लपवून ठेवत शासनाचे मानधन घेणाऱ्या या अंगणवाडी सेविकेला तातडीने पदावरून कमी करून शासनाची फसवणूक करून घेतलेले मानधन वसूल करण्यात यावे, अशी मागणी होत आहे. केवळ रोहा तालुक्यात तीन अपत्य असून देखील अंगणवाडी सेविका, मदतनीस म्हणून कार्यरत असणाऱ्यांची संख्या दोन आकडी असून जिल्ह्यात हा आकडा शेकड्यात असल्याची धक्कादायक माहिती मिळत आहे. याबाबत रोहा तालुका बालविकास प्रकल्प अधिकारी यांना विचारणा केली असता सदर बाब न्यायप्रविष्ट आहे. याबाबतचा अहवाल आम्ही वरिष्ठ कार्यालयात सादर केला आहे असे सांगितले.

करपा रोगामुळे सुपारी बागायतदार हवालदिल

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

मुरुड तालुक्यातील बागायतदार शेतकऱ्याचे प्रमुख उत्पादनाचे पिक असलेल्या सुपारी रोपांवर गेल्या काही महिन्यांपासून करपासदृश्य रोग पडल्याचे दिसून येत आहे. बागायतीतील अनेक एक ते दोन वर्षांच्या रोपांची मधली कोवळी पाने ही करपल्यासारखी दिसत असून रोपे वाळल्यासारखी दिसत आहेत. सध्या मुरुडमध्ये वातावरणाचा पारा हा ३८ अंशावर जात असल्याने उष्णतेचे तसेच हवेतील आर्द्रतेचे प्रमाण खूपच वाढले आहे. सततचे ढगाळ वातावरण, थंडीची कमतरता, विहिरीतील पाण्यातील क्षाराचे वाढते प्रमाण यामुळे येथील नारळ, सुपारीचे पिक धोक्यात आले आहे.

हवेतील उष्णता वाढल्याने नारळ व सुपारीच्या झाडांना लागलेल्या छोट्या छोट्या फळांचीही गळ सुरु झाली आहे. निसर्ग, तौक्ते वादळात येथील बागायतीतील नारळ सुपारीची बाजती झाडे जमीनदोस्त झाल्याने बागायतदारांचे आधीच मोठे नुकसान झाले आहे. त्याची भरपाई करताकरता बागायतदारांच्या नाकी नऊ आले असतांना उजाड बागायतीत नव्याने लागवड करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सुपारीची रोपेच करपू लागली आहेत. बदलत्या हवामानाचा फटका आता या पिकांना बसत असल्याने येथील शेतकरी हवालदिल झाले आहेत. कृषी अधिकाऱ्यानी या रोगाची पाहणी करुन कृषी विद्यापिठातील तज्ज्ञांना त्यावरील उपाय शोधावेत अशी मागणी येथील बागायतदारांनी केली आहे.

'डॉल्बी डीजेचा आग्रह टाळून ध्वनिप्रदूषण टाळा'

। नेरळ । वार्ताहर ।

नेरळ पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या गावात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शासनाचे निर्देश याबद्दल माहिती देण्यासाठी शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करीत असताना त्यांच्या विचारांची माहिती देणारी व्याख्याने आयोजित करावी आणि प्रबोधन करावे असे आवाहन कर्जतचे पोलीस उपअधीक्षक विजय लगारे यांनी केले. शांतता कमिटीच्या बैठकीत जयंतीनिमित्त आयोजित मिरवणुकीत डॉल्बी आणि डीजेच्या ध्वनीप्रदूषण होणार नाही याची काळजी घेण्याचे अवाहन केले. त्याचवेळी सर्वांनी भविष्यात अशा उत्सवांना पोलीस बंदोबस्ताची गरज भासणार नाही असे आदर्शवत कार्य करावे असे आवाहन देखील लगारे यांनी केले. त्यावेळी मोहाचीवाडी, दहिवली, डिकसळ, आसल, नांदगाव, शेलू, बोपेले येथील मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

खोपोलीत शांतता कमिटीची बैठक

। खोपोली । प्रतिनिधी ।

हनुमान जयंती, महावीर जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, रमजान ईद अशा विविध सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी ११ एप्रिल रोजी खालापूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी संजय शुक्ला आणि पोलीस निरिक्षक शिरीष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शांतता कमिटी सदस्यांची बैठक संपन्न झाली. यावेळी अनुप दुरे, डॉ. सुनील पाटील, हरेश काळसेकर, लक्ष्मीकांत गलांडे, हरीष काळे, यशवंत साबळे, संजय तन्ना, रिचर्ड जॉन, संदेश धावारे, अरुण गायकवाड, चंदनमल जैन, राजू जैन, सुभाष पोरवाल, दिलीप पोरवाल, सतीश रावळ, दिलीप पवार, राहुल जाधव, गोपाळ बारस्कर, विकास नाईक, नरेंद्र हर्डीकर, संतोष देशमुख, हनुमंतराव ओव्हाळ, अनुराग कोंडावले, संजय हारपुडे, किशोर सुतार,भक्ती, साठेलकर, गोपनीय अजिंक्य पाटील उपस्थित होते.

ठेकेदाराकडून चालकांचे आर्थिक शोषण

। मुरुड । वार्ताहर ।

ग्रामीण भागातील रुग्णांना त्वरीत उपचार मिळावा यासाठी केंद्र शासनाकडून राष्ट्रीय आरोग्य अभियान सुरु केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून राज्यात १०२ नंबरच्या रुग्णवाहिका कार्यरत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत असणाऱ्या १०२ वाहन चालकांना शासनाच्या वतीने थेट वेतन देण्यात येते. जिल्हा रुग्णालय अंतर्गत असणाऱ्या १०२ वाहन चालकांना कंत्राटदारांकडून वेतन देण्यात येते. जिल्हा रुग्णालय व ग्रामीण आरोग्य केंद्र या दोन्ही १०२ वाहन चालकांच्या वेतनामध्ये मोठी तफावत आढळून येते.

जिल्हा रुग्णालय अंतर्गत १८ चालकांचे वेतन अदा करणे केंद्र सरकारची जबाबदारी आहे. परंतु राज्य शासन मागील अनेक वर्षापासून कार्यरत असलेले वाहनचालकांना कंत्राटी पद्धतीने चालकांची नियुक्ती करुन ठेकेदारामार्फत त्यांना वेतन दिले जात आहे. केंद्र शासनाच्या नियमानुसार किमान वेतन देणे अनिवार्य असतानासुद्धा या नियमाचे उल्लंघन करीत हे ठेकेदार या चालकांची तसेच शासनाची फसवणूक करत आहेत आणि ठरवलेल्या वेतनातून अर्धे वेतन चालकांना देऊन त्यांचे मोठ्याप्रमाणात आर्थिक व मानसिक शोषण करीत आहेत.

चालकांना ५-६ महिने पगार वेळेत मिळत नाही. आणि मिळाला तर तोही अर्धाच हाती येतो. वाढणाऱ्या महागाईचा विचार करता या चालकांना आपले कुटुंब चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावयाचा, हा प्रश्न या चालकांना पडला आहे.

ठेकेदार न नेमता राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत वेतन दिले जावे अशी मागणी चालक करीत आहेत. कारण जिल्हा रुग्णालय अंतर्गत १०२ चे चालक कंत्राटी पद्धतीने १८ चालकांची नियुक्ती केली आहे. यांना शासनाचा १५,९३१ रुपये वेतन आहे. यातील प्रत्यक्ष सर्व कपात होऊन १२२८४ हातात मिळणे असताना कंत्राटदार ८९८३ रु वेतन चालकांना देत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत १०२ रुग्ण वाहिकेचे ५४ चालक आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत १०२ वाहन चालकना सर्व कपात होऊन १७,४९० वेतन हातात पडत आहेत. तर या प्राथमिक आरोग्य केंद्र व जिल्हा रुग्णालयातील १०२ च्या चालकांच्या पगारात सुमारे १०,००० फरक आढळून येत आहे.

रोग निदान शिबिराचे आयोजन

। तळा । वार्ताहर ।

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तालुका आरोग्य अधिकारी तळा आयोजित प्राथमिक आरोग्य केंद्र/गो.म.वेदक विद्यामंदिर तळा येथे सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन १८ एप्रिल रोजी सकाळी ९ ते दु.३ वा.पर्यंत होणार आहे. तळा तालुक्यातील रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्याच्या दृष्टीने तळा तालुका आरोग्य अधिकारी, एम.जी.एम. हॉस्पिटल कळंबोली,/कामोठे, स्वदेश फाऊंडेशन लोणेरे माणगांव प्राथमिक आरोग्य केंद्र तळा यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येत आहेत. या शिबिरात स्त्रीरोग, नाक, कान, घसा, बालरोग, अस्थीरोग दंत चिकित्सक, मिषक याआजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी केली जाणार आहे. नाव नोंदणीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र तळा, महागांव, मांदाड, येथील रुग्णांनी आधार कार्ड, रेशनकार्ड घेऊन यावे.असे आवाहन उपसंचालक आरोग्य सेवा मुंबई ठाणे जिल्हा शल्यचिकित्सक सामान्य रुग्णालय, अलिबाग जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद अलिबाग यांनी केले आहे.



संपादकीय

भ्रष्टाचाराच्या भेंड्या

राज्यात सध्या भ्रष्टाचार उकरून काढण्याची स्पर्धा लागली आहे. आधी भाजपच्या केंद्रीय यंत्रणा महाविकास आघाडीच्या मागे हात धुवून लागल्या होत्या. आघाडीचे नेते त्यावेळी भिजलेल्या मांजरासारखे बसले होते. पण शाहरुख प्रकरणात नबाब मलिकांनी समीर वानखेडे यांच्यावर बाजी उलटवली आणि या नेत्यांच्या जिवात जीव आला. आपणही प्रतिहल्ला करू शकतो याची त्यांना जाणीव झाली. मग भाजपच्या नेत्यांच्या भानगडी काढण्याचे प्रयत्न झाले. पण बराच काळ त्यातून काही हाती लागले नाही. उलट केंद्राने अधिक त्वेषाने कारवाई केली आणि अनिल देशमुख, नबाब मलिक हे मंत्री तुरुंगात गेले. मुंबई पालिकेतील स्थायी समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव यांच्या कथित मालमत्तेचे तपशील उघडे करून थेट मातोश्रीलाच संशयाच्या जाळ्यात आणण्यात केंद्राला यश आले. संजय राऊत यांचीही मालमत्ता जप्त झाली. पण आता किरीट सोमय्या प्रकरणात मात्र भाजपला काही प्रमाणात बॅकफूटवर ढकलण्यात आघाडीला यश आलेले दिसते. बुधवारी सोमय्या यांना उच्च न्यायालयाने अटकेपासून काही प्रमाणात संरक्षण दिले. त्यांना अटक झालीच तर पन्नास हजारांच्या वैयक्तिक जातमुलक्यावर त्यांची सुटका करावी असे न्यायालयाने सांगितले आहे. ५७ कोटींच्या अपहाराबाबतचा सोमय्या यांच्यावरचा आरोप हा अस्पष्ट आणि वृत्तपत्रीय बातम्यांवर आधारलेला आहे असा अभिप्रायही त्याने व्यक्त केला आहे. आता जबाबदारी महाविकास आघाडीची आहे. २०१३ मध्ये विक्रांत युद्धनौका भंगारात न टाकता तिचे मुंबई बंदरात वा अन्यत्र स्मारक करावे अशा कल्पना मांडण्यात आल्या होत्या. सरकार याचा खर्च करायला तयार नसल्याचे दाखवण्यासाठी जनतेतून उत्स्फूर्तपणे निधी गोळा करण्याची मोहिम सोमय्यांनी तेव्हा राबवली होती. त्यावेळी त्यांनी ५७ कोटी रुपये जमा झाल्याचा दावा केला असावा. हे पैसे त्यांनी राजभवनावर जाऊन राज्यपालांकडे सूपूर्द केल्याचा एक कार्यक्रम केला. परंतु कोणत्या खात्यात हे पैसे स्वीकारायचे याबाबत स्पष्टता नसल्यामुळे सोमय्यांनी हे पैसे भाजपकडे जमा करून टाकले, असा आरोप आहे. हे जर खरोखर घडले असेल तर जनतेच्या पैशांचा हा मोठा अपहार आहे. किरीट सोमय्या हे गुणवत्ता यादीतले चार्टर्ड अकौंटट आहेत. शिवाय विविध लोकांचे भ्रष्टाचार बाहेर काढण्याचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे. ज्या कामासाठी जमा केलेले पैसे त्यासाठी खर्च न करता भलत्याच ठिकाणी वळवणे ही साधीसुधी अनिमियतता नाही हे त्यांना इतर कोणी सांगण्याची गरज नाही. भाजपविरोधी कोणाच्याही बाबतीत असा प्रकार झाला असता तर कदाचित अमित शहांपासून झाडून सर्व नेत्यांनी यावर प्रतिक्रिया दिल्या असत्या. ज्याच्यावर असा आरोप आहे त्याच्या पक्षाला देशद्रोही ठरवण्यात आले असते. सोमय्या मात्र गेले चार दिवस गायब असून केवळ व्हिडिओ संदेश प्रसृत करीत आहेत. भाजपचे इतर प्रवक्ते, नेते हेही यावर गुळमुळीत बोलत आहेत. हा सर्व प्रकार संशय निर्माण करणारा आहे. आता तपास अधिकाऱ्यांनी या प्रकरणाचा कसून तपास करायला हवा. महाविकास आघाडीची त्यात कसोटी लागेल. यातून काहीही ठोस बाहेर पडले नाही तर तिचे हसे होईल. आजवर केंद्राच्या तपास यंत्रणांनी शिवसेना किंवा राष्ट्रवादीच्या नेत्यांची जी प्रकरणे बाहेर काढली त्यामध्ये भरपूर संशय निर्माण करण्यात आणि संबंधित नेते खरेच दोषी आहेत असा समज पसरवण्यात मोठे यश मिळवले आहे. सोमय्या प्रकरणात आघाडी तसे करू शकले नाही तर तिची उरलीसुरली अब्रू व नैतिक अधिकारही नष्ट होईल. त्यामुळे हे सर्व लक्षात घेऊन संबंधित तपास अधिकाऱ्यांना कामाला लावले गेले पाहिजे. अन्यथा, केंद्र किंवा भाजपच्या नावाने खडे फोडण्याला काही अर्थ राहणार नाही. दरम्यान भ्रष्टाचाराच्या आरोपांच्या या ज्या भेंड्या दोन्ही बाजूंनी लावल्या आहेत त्यामुळे भ्रष्टाचार या विषयाचे गांभीर्य नष्ट झाले आहे, ही चिंतेची बाब आहे. केंद्रात भाजप आल्यापासून खून जरी घडला तरी तो करणारा कोणत्या धर्माचा आहे ते पाहून त्याविषयी काय बोलायचं हे ठरवले जाऊ लागले आहे. तीच गत आता भ्रष्टाचाराची झाली असून त्यालाही पक्षीय राजकारणातले आरोप इतकीच किंमत उरली आहे. जनतेच्या दृष्टीने ही हिताची गोष्ट नाही.

आंबेडकरी चळवळीचं वास्तव

प्रा. जयदेव डोळे

समाजवाद हा विचार देशातल्या अनेक नागरिकांनी त्यागला तसा आंबेडकरांच्या अनुयायांनीही त्यागला. म्हणूनच गेल्या तीस वर्षांमध्ये जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण झाल्यानंतरही ही अनुयायी मंडळी फारसा प्रतिकार करु शकली नाहीत. उलटपक्षी, ती त्याच्या बळकटीकरणातच गुंतली. म्हणून आज आंबेडकरांचे अनुनायी एकाकी पडल्यासारखे वाटतात.

लवकरच औरंगाबादमध्ये महापालिकेची निवडणूक येऊ घातली आहे. हे लक्षात घेऊन चौकाचौकात फ्लेक्स लागायला सुरूवात झाली आहे. १४ एप्रिलच्या निमित्तानं अनेक कार्यकर्ते, नेते फ्लेक्स लावतात. हे शहर बाबासाहेब आंबेडकरांना अतिशय मान देणारे शहर म्हणून ओळखले जाते. बाबासाहेबांनी मुंबईनंतर याच शहरात 'मिलिंद महाविद्यालय' नावाची एक शिक्षण संस्था सुरू केली. त्याकाळी उत्कृष्ट दर्जाचे प्राध्यापक, भव्य ग्रंथालय, अत्यंत देखणी अशी इमारत या सगळ्या सोयींमुळे महाराष्ट्रभरातून या संस्थेमध्ये शिक्षण घेण्यास विद्यार्थी येत असत. ते सर्व जातीधर्माचे असत. बाबासाहेबांच्या प्रभावामुळे या संस्थेमध्ये एक प्रकारचं राजकीय शिक्षणही मिळत होतं. म्हणजेच अधिकार, हक्क, घटनात्मक तरतुदी, सवलती, आरक्षण या सगळ्या गोष्टींचा राजकीय प्रभाव विद्यार्थीदशेपासूनच मुलांच्या मनावर पडायचा. म्हणूनच या शहराला राजकीय चळवळीचं केंद्र मानलं गेलं. हे सगळं विवेचन देण्याचं कारण म्हणजे आत्ताच्या फ्लेक्स संस्कृतीकडे बघताना जाणवतं की आंबेडकरांचा विचार ऐकून, त्यांची पुस्तकं पडताळून किंवा राजकीय कामाचा आढावा घेऊन कोणी स्वत:मध्ये सुधारणा करताना दिसत नाही. कारण सध्या सत्तेतल्या राजकारणाची अवस्था अशीच होत जाते. जुने-जाणते नेते केवळ शोभेला ठरवायचे आणि त्यांची तत्त्वं, मूल्य, आचरण या सगळ्या गोष्टींना सुरुंग लागेल अशा प्रकारचं राजकारण करायचं, हीच स्थिती आता बघायला मिळते.

आजच्या आंबेडकरी चळवळीकडे बघताना हे प्रकर्षानं जाणवतं की, आंबेडकरांनी जातीसंस्था नष्ट करण्याचा विडा उचलला होता. जातीसंस्थेतून देशात विषमता उत्पन्न झाली असल्याने ही संस्थाच नष्ट झाली पाहिजे, असं त्यांचं म्हणणं होतं. जी जातीसंस्था धर्मातून आली तो धर्मही त्यांनी सोडून दिला. म्हणजेच विषमता नष्ट करण्याची इतकी तळमळ असणारे बाबासाहेब एकीकडे आणि सर्व राजकीय तडजोडी करण्यात तरबेज असणारे नवे पुढारी एकीकडे अशी सध्याची स्थिती आहे. परिणामत: आपण जातीसंस्था नष्ट करणार आहोत का, असा प्रश्नही चळवळीतल्या या संभाव्य नेत्यांना, कार्यकर्त्यांना पडत नाही. सामाजिक स्वातंत्र्य हे राजकीय स्वातंत्र्यानंतर मिळालं पाहिजे असं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलं होतं. जोडीला दलितांना आर्थिक स्वातंत्र्यही हवं, असं ते म्हणत होते. आता राजकीय स्वातंत्र्य उपलब्ध आहे पण ज्या जातीतून बाबासाहेब आले त्यांना कितपत सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्य आहे, असा प्रश्न केला तर आता ते हातातून गमावत

असल्याचं चित्रच समोर दिसतं. राजकारणात धर्म नसावा असं आपलं संविधान सांगतं. सरकार आणि धर्म यांचा संबंध नसणं म्हणजेच धर्मनिरपेक्षता... पण धर्माचाच आधार घेऊन राजकीय पक्ष राजकारण करु लागले, सत्ता मिळवू लागले की त्या धर्मातल्या सर्व गोष्टींना पुनरुज्जीवन लाभतं. याच न्यायाने आता जातीसंस्थेला पुनरुज्जीवन लाभत आहे, जातीमुळे निर्माण झालेल्या विषमतेला बळ मिळत आहे. अनेक वाईट परंपरांना आता पुनरुज्जीवन मिळत आहे.

शबरीमालाचं उदाहरण अथवा महिलांच्या मासिक पाळीच्या निमित्तानं निर्माण झालेले वाद वा स्त्रियांना कुटुंबातील संपत्तीमध्ये वाटा असावा की नसावा याविषयीचा वाद, धर्मांतराचा विषय हे सगळं बघता राजकारण आणि धर्म या गोष्टी एकत्र आल्या की त्याचा ताप सगळ्यात खालच्या जातींना होतो हे सत्य पुन्हा प्रकर्षानं जाणवत आहे. हे सगळं लक्षात घेता आजची आंबेडकरी चळवळ याविरुद्ध कितपत ठामपणे उभी आहे हे समजत नाही. रामदास आठवले सरळ सरळ धार्मिक राजकारण करणाऱ्या पक्षाबरोबर सत्तेत आहेत. देशातले सेक्युलर पक्ष बाकीच्या आंबेडकरी पक्षांना भाजपाच्या पंक्तीत बसवत आहेत. याचा अर्थ आंबेडकरी चळवळ आपलं पुर्वीचं वैचारिक बळ गमावून बसलेली दिसते. याचं कारणच हे की जातीसंस्था, विषमता, अन्याय या गोष्टींकडे त्यांचं कमालीचं दुर्लक्ष झालं आहे. आणखी एक वैशिष्ट्य असं दिसतं की शिक्षण, सत्ता आणि प्रशासन यामध्ये जितका अधिकाधिक वाटा मिळतो, तितका त्या जातीतला मध्यमवर्ग वाढत जातो. एकदा मध्यमवर्गीय स्वरुप वाढत गेलं की राजकीय भूमिका घेणं अवघड जातं. तशाच प्रकारे दलित जातींमध्ये मध्यमवर्ग वाढला आणि त्या जातीला टोकदार राजकीय प्रतिकार करता येईनासा झाला. आता या वर्गातली संपूर्ण तरुण पिढी अराजकीय होऊन बसली की काय, अशी शंका येऊ लागली आहे. त्यांचा सरकारी अधिकारी होण्याकडे वाढलेला कल, सरकारमध्येच शिरुन सत्तेचा वाटा मिळवण्याकडे झुकणारी मानसिकता एका अर्थानं हेच दाखवते की मला प्रस्थापित सत्तेविरुद्ध काहीही करण्यात स्वारस्य नाही. मला प्रस्थापितांपैकीच एक व्हायचं असल्यामुळे प्रस्थापित व्यवस्था, परंपरा, चालीरिती, सत्तारचना मोडायचीच नाही. म्हणूनच आंबेडकरी चळवळीमध्ये एकप्रकारचं शैथिल्य आणि बोथटपणा आला आहे, असं मला वाटतं.

उत्तर प्रदेशमध्ये मायावती यांनी तडजोडीचं राजकारण केलं. महत्त्वाचं म्हणजे ते आंबेडकरांच्या प्रतिमेखाली केलं. त्यामुळेही अन्य जातीय नागरिकांमध्ये आंबेडकरी चळवळीबद्दल संशय आणि दुरावा उत्पन्न झाला. सत्तेसाठी तत्त्वांशी तडजोड करणं अनेकांना पसंत नसतं. खुद्द आंबेडकरांनी आयुष्यभर काँग्रेसला विरोध केला पण देशाच्या प्रगतीसाठी त्यांनी काँग्रेसच्या मंत्रिमंडळातही प्रवेश केला. राज्यघटना निर्माण करण्यासाठी त्यांनी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांची सोबत केली. पण त्यामुळे ते तडजोडवादी ठरले नाहीत. त्यांनी धर्मांतर तर केलंच पण जातीसंस्थेवरील हल्लेही थांबवले नाहीत. गेल्या पंचवीस वर्षांमधल्या तडजोडीच्या राजकारणाकडे पाहिलं तर आंबेडकरी चळवळीनं आपला हा पाया गमावल्याचं दिसतंच, त्याचबरोबर आंबेडकरांना मानणाऱ्या करोडो भारतीयांच्या मनातला आदरही गमावल्याचं दिसून येतं. आणखी एक बाब म्हणजे आंबेडकर स्वत:ला समाजवादी म्हणवून घ्यायचे. ते अर्थशास्त्रज्ञ होते. त्यामुळे रुढार्थाने समाजवादी विचारांच्या असणाऱ्या पक्षांशी त्यांची जवळीक होती. समता, बंधुता, स्वातंत्र्य या तत्त्वत्रयींच्या स्थापनेसाठी समाजवादच जवळचा आहे, असं त्यांना वाटायचं. आता समाजवाद हा विचार देशातल्या अनेक नागरिकांनी त्यागला तसाच तो आंबेडकरांच्या अनुयायांनीही त्यागला आहे. म्हणूनच गेल्या तीस वर्षांमध्ये जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण झालं असलं तरी ही अनुयायी मंडळी त्याचा फारसा प्रतिकार करु शकली नाही. उलटपक्षी, ती त्याच्या बळकटीकरणातच गुंतली. म्हणूनच आज खासगीकरणाद्वारे आरक्षण घटत असताना आंबेडकरांचे अनुनायी एकाकी पडल्यासारखे वाटतात. आरक्षणाचा अधिकार शाश्वत आहे हेदेखील ते पटवून देऊ शकत नाहीत.

जातीसंस्था आणि सामाजिक विषमता असेपर्यंत आरक्षण असलं पाहिजे हा मुद्दा ठाशीवपणे मांडण्यास त्यांच्यातून फार कमी लोक पुढे येताना दिसतात. आणखी एक मुद्दा म्हणजे सरकार, प्रशासन आणि सत्तेचं राजकारण यामध्येच लक्ष गुंतल्यामुळे माध्यमांमध्ये प्रवेश करुन आपला विचार अधिकाधिक लोकांपर्यंत पसरवण्यासाठीही आंबेडकरी चळवळीतली तरुण पिढी पुढाकार घेताना दिसत नाही. काही मोजक्या माणसांकडून किरकोळ प्रयत्न होताना दिसत असले तरी ती कौशल्यं आणि क्षमता उपलब्ध असतानाही त्यापासून दूर रहाण्याचं अनेकांचं धोरण योग्य वाटत नाही. यासंदर्भात एक बाजू अशी की, खाजगी क्षेत्रामध्ये शिरकाव केल्यास तिथे जातीभेदाचं राजकारण नसेलच याची खात्री देता येत नाही. कारण खाजगी क्षेत्राला आरक्षणाचे नियम लागू नाहीत. असं असलं तरीही खासगी क्षेत्रात बहुतांश नोकऱ्या जातींवर, नातलगांसाठी आणि परिचितांमध्येच दिल्या जातात. या क्षेत्राची उभारणीदेखील जात, धर्म, नातलग, ओळखीपाळखी, वर्तुळ यातच आढळते. म्हणूनच कदाचित युवकांना खाजगी क्षेत्रात आलं तर जातीभेदाची वागणूक मिळणार नसल्याची खात्री वाटत नाही. त्यामुळेच सरकारी क्षेत्राकडे त्यांचा जास्त ओढा दिसतो. त्याचा परिणाम अराजकीय होण्याकडे स्पष्ट दिसून येतो. आंबेडकरांची अवघी चळवळ राजकीय आणि सामाजिक होती. त्यातल्या एका मुद्द्याकडे दुर्लक्ष केलं तर दुसरा मुद्दाही बारगळतो हे आजच्या तरुण आंबेडकरवाद्यांनी लक्षात घेतलं पाहिजे. दलित जातीअंतर्गत असणारे मतभेद आणि स्पर्धा हा देखील यातला एक महत्त्वाचा मुद्दा आहे. महाराष्ट्रात बौद्ध, मातंग, ढोर आणि चर्मकार या चार जातींमध्ये विनाकारणच स्पर्धा, कटुता आणि सत्तेच्या राजकारणाचे गुंते आहेत. त्यामुळेही आंबेडकरांसारख्या प्रखर राजकीय नेत्याचे आणि तत्वज्ञाचे विचार आणि मार्गदर्शन उपलब्ध असूनही त्यांना मान्यता देणारी विशिष्ट जातच आपल्याला दिसते. म्हणूनच उर्वरित अनुसूचित जातीच्या नागरिकांनी आंबेडकरांचा स्वीकार करणं अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्याखेरीज राजकीय, सामाजिक आणि आर्थिक उद्धार होणार नाही हे सर्वांनी लक्षात घेतलं पाहिजे.

यारा-वारा

अतुल गुळवणी

जलयुक्त रायगड

निसर्गाचं वरदान लाभलेल्या रायगडात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होत असते. पण त्या प्रमाणात जलसिंचन होणे आवश्यक आहे त्या प्रमाणात होत नाही हे आपल्या सर्वांचेच दुर्दैव म्हटले पाहिजे. यामागे अनेक कारणे आहेत. काही मानवनिर्मित तर काही निसर्ग निर्मित. मानव निर्मितीत रखडलेले जलसिंचन प्रकल्प हा एक मोठा विषय रायगडात आहे. जिल्ह्यात रायगड जिल्ह्यात मोठे १, मध्यम २, लघु ५१ असे एकूण ५४ जलसिंचन प्रकल्प पूर्ण झाले आहेत, मात्र बांधकामाधीन ९ प्रकल्प अद्याप पूर्ण झालेले नाहीत. जिल्ह्यातील प्रामुख्याने काळ, अंबा, राजनाला, हेटवणे, सांबरकुंड, अंबोली, पाली-भूतावली, नागेश्वरी, कोथेरी, वडशेतवावे, काळवली-धारवली, कोंढाणे, पन्हाळघर, बाळगंगा, हरिहरेश्वर, मारळ आणि काळ-कुंभे हे जलसिंचन प्रकल्प अजूनही अपुर्णावस्थेत आहेत. ते जर पूर्ण झाले तर रायगड जलयुक्त झाल्याशिवाय राहणार नाही. कारण या प्रकल्पांमुळे हजारो एकर शेतीला पाणीपुरवठा होणार आहे. शिवाय वाढते नागरीकरण, औद्योगिकीकरणाला पाणी पुरवठा करणे शक्य होणार आहे. रायगड हा मुंबई, ठाण्याला समिप असल्याने जिल्ह्याचे नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. अशावेळी सर्वांना पाणी पुरवठा होणे आवश्यक आहे. पण अपूर्ण प्रकल्पांमुळे सर्वांना मुबलक पाणी पुरवठा करताना प्रशासनाला कसरत करावी लागते. शिवाय दरवर्षी मार्चपासूनच जिल्ह्यात टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो. त्यावर दरवर्षी कोट्यवधींचा खर्च करावा लागतो. अशावेळी जर जलसिंचन विभागाने रायगडातील अपूर्णावस्थेतील प्रकल्प पूर्ण करुन घेतले तर दरवर्षी भेडसावणारी पाणीटंचाई कमी होईल आणि टँकरद्वारे करावा लागणारा पाणीपुरठा थांबेल. यासाठी विद्यमान महाविकास आघाडी सरकारने विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.जलसंपदा मंत्री जयंतराव पाटील यानी रायगडातील जलसिंचन प्रकल्पांचा आढावा घेतला खरा, पण केवळ आढावा घेऊन चालणार नाही तर त्यासाठी योग्य पाठपुरावा करावा, एवढेच सांगणे.

भाऊ का रुसले?

रायगडच्या राजकारणात सध्या विशेष करुन राष्ट्रवादीच्या गोटात सुरेशभाऊ लाड का रुसले हा प्रश्न विचारला जात आहे. भाऊंचे रुसणे तसं नवं नाही.कारण यापूर्वीही भाऊंचा रुसवा काढण्यात यश आले खरे पण त्यांचे लाड पुरविण्याकडे रायगडच्या पक्षश्रेष्ठींनी हेतुत: कानाडोळा केल्याने भाऊंना पुन्हा एकदा रुसावे लागले अशी जोरदार चर्चा रायगडच्या राजकारमात सुरु आहे.भाऊंचे रुसणे तसे स्वाभाविकच आहे.कारण २०१९ मध्ये भाऊंना विधानसभा निवडणुकीत पराभवाला सामोरे जावे लागले होते.त्यांच्या पराभवाला कोण जबाबदार होते हे सर्वश्रुत आहे.जर भाऊ निवडून आले असते तर आज कदाचित रायगडचे पालकमंत्री म्हणून ते मोठ्या दिमाखाने जिल्ह्यात वावरले असते.त्यामुळेच संभाव्य धोका ओळखून भाऊंना कर्जतमध्येच पराभूत करण्यात आले आणि सत्तेची सारी सूत्रे एकाच परिवाराकडे केंद्रीत झाली.याच एकाधिकारशाहीने जिल्ह्यात राष्ट्रवादीमध्ये निष्ठावंतांचा परस्पर पत्ता कट करण्याचे सुरु झाले.भाऊंना काहीतरी द्यायचे म्हणून जिल्हाध्यक्षपद दिले खरे,पण त्यात भाऊंना काहीच अधिकार नव्हते.त्यामुळे निदान महामंडळ तरी मिळावे अशी अपेक्षा भाऊंनी समर्थकांच्या माध्यमातून व्यक्त करायला सुरुवात केली.पण आजतागायत राज्यातील महाविकास आघाडी सरकारने कुठल्याच महामंडळ पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या न केल्याने भाऊंसारख्या नेत्यांना मग नाराजीचे अस्त्र बाहेर काढावे लागले.गेले दोन दिवस राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे संवाद यात्रेच्या निमित्ताने रायगडच्या दौऱ्यावर आलेले आहेत.या दौऱ्यात जिल्हाध्यक्ष या नात्याने सुरेश लाड यांचा सहभाग असणे अपेक्षित होते.पण दौऱ्यात कुठेही भाऊ दिसले नाहीत.त्यामुळे या चर्चांना जोर आला आहे. प्रदेशाध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली होणारी जिल्हा कार्यकारिणीची बैठकच रद्द करण्याची नामुष्की पक्षावर आली.भाऊंच्या या बंडामुळे राष्ट्रवादीत सारंच आलबेल आहे असे समजून चालणार नाही.

म्हणून कृष्णभावनेतील आत्म-साक्षात्कारी मनुष्याने इतरांना त्यांच्या कर्मांपासून विचलित करु नये किंवा त्यांचा बुद्धिभेद करु नये, तर सर्व कर्मांचे फळ श्रीकृष्णांच्या सेवेमध्ये कसे अर्पण करता येते हे त्याने आपल्या आचरणाद्वारे दाखवून द्यावे. कृष्णभावनाभावित विद्वान व्यक्तीने अशा प्रकारे आचरण करावे की, ज्याद्वारे इंद्रियतृप्तीकरीता कर्म करणारा अज्ञानी व्यक्ती कर्म कसे करावे आणि आचरण कसे करावे हे जाणू शकेल. जरी अज्ञानी मनुष्याच्या कर्मात व्यत्यय आणावयाचा नसला तरी कृष्णभावनेमध्ये अल्प प्रगती केलेला मनुष्य, वेदोक्त कर्मकांडांवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष भगवंतांच्या सेवेत संलग्न होऊ शकतो. अशा भाग्यशाली मनुष्याला वैदिक कर्मकांडांचे पालन करण्याची आवश्यकता नाही. कारण विहित कर्मांचे पालन केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या सर्व फळांची प्राप्ती त्याला प्रत्यक्ष कृष्णभावनेद्वारा होऊ शकते.

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ।
अहङ्कारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ।।२७।।

प्रकृतेः- प्रकृतीच्या; क्रियमाणानि- केली जाणारी; गुणैः- गुणांद्वारे; कर्माणि- कर्मे; सर्वशः- सर्व प्रकारच्या; अहङ्कार-विमूढ- मिथ्या अहंकाराने मोहित झालेला; आत्मा- आत्मा; कर्ता- कर्ता; अहम्- मी; इति- असे; मन्यते- मानतो.

मिथ्या अहंकाराच्या प्रभावाने मोहित झालेला आत्मा स्वतःलाच कर्माचा कर्ता समजतो, पण वास्तविकपणे प्रकृतीच्या तीन गुणांद्वारे कर्मे केली जातात.

तात्पर्य : एकाच पातळीवर कार्य करणारे, एक कृष्णभावनाभावित मनुष्य आणि दुसरा भौतिक भावनेने प्रभावित झालेला मनुष्य, असे दोघेही वरकरणी एकाच स्तरावर असल्यासारखे दिसतात; परंतु त्यांच्या आपापल्या स्थितीमध्ये बराच भेद आहे. भौतिक भावनायुक्त मनुष्याचा, मिथ्या अहंकाराच्या प्रभावामुळे दृढ विश्वास असतो की, आपणच सर्व गोष्टींचे कर्ता आहोत. त्याला माहीत नसते की, शरीराची यंत्रणा ही भगवंतांच्या अध्यक्षतेखाली कार्य करीत असणाऱ्या भौतिक प्रकृतीमुळे निर्माण झालेली असते. तसेच शेवटी तो श्रीकृष्णांच्याच नियंत्रणाखाली कार्य करीत असतो, याचे देखील ज्ञान नसते. मिथ्या अहंकाराने युक्त असलेला मनुष्य प्रत्येक गोष्ट स्वतंत्रपणे करण्याचे सारे श्रेय स्वतःकडे घेत असतो आणि हेच त्याच्या अज्ञानाचे लक्षण आहे. त्याला माहीत नसते की, हे स्थूल आणि सूक्ष्म शरीर म्हणजे भगवंतांच्या आज्ञेनुसार कार्य करणाऱ्या प्रकृतीची निर्मिती आहे. यास्तव त्याने आपली शारीरिक आणि मानसिक कार्ये कृष्णभावनेमध्ये श्रीकृष्णांच्या सेवेसाठी संलग्न करणे अत्यावश्यक आहे. अज्ञानी मनुष्य विसरतो की, पुरुषोत्तम श्रीभगवान हे ऋषीकेश किंवा इंद्रियांचे स्वामी म्हणून गणले जातात. आपल्या इंद्रियतृप्तीकरीता अशा मनुष्याने दीर्घकाळ इंद्रियांचा दुरुपयोग केलेला असल्यामुळे तो अज्ञानी मनुष्य वास्तविकपणे मिथ्या अहंकाराने मोहित झालेला असतो आणि याच मिथ्या अहंकारामुळे त्याला भगवान श्रीकृष्णांशी असणाऱ्या आपल्या शाश्वत संबंधाचे विस्मरण होते.

तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ।
गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते ।।२८।।

तत्त्व-वित्- परम सत्य जाणणारा; तु- परंतु; महा-बाहो- हे महाबाहू अर्जुन; गुण-कर्म- भौतिक प्रभावाखाली करण्यात आलेली कर्मे; विभागयोः- भेद; गुणाः- इंद्रिये; गुणेषु- इंद्रियतृप्तीमध्ये; वर्तन्ते- रत होतात; इति-याप्रमाणे; मत्वा- मानून; न- कधीच नाही; सज्जते- आसक्त होतो.

हे महाबाहू अर्जुन! ज्याला परम सत्याचे ज्ञान आहे तो इंद्रियांमध्ये किंवा इंद्रियतृप्तीमध्ये रममाण होत नाही कारण तो भक्तिपूर्ण कर्म आणि सकाम कर्म यांच्यातील भेद उत्तम प्रकारे जाणतो.

तात्पर्य : परम सत्याचे ज्ञान असणारा मनुष्य प्राकृतिक संगतीमुळे होणाऱ्या आपल्या विचित्र अवस्थेला जाणतो. तो जाणतो की, आपण पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्ण यांचे अंश आहोत आणि आपले स्थान भौतिक सृष्टीमध्ये असू नये.

(क्रमशः)

लोकसंसद

संभ्रमात पडलेला नेता

राज ठाकरे यांच्या दोन्ही सभेतून फक्त संवेदनशील, भयप्रद वातावरण निर्मितीच झाली. उत्तरसभा ही वादग्रस्त, सामाजिक वातावरण दूषित करताना नेहमीप्रमाणे राजकीय नेत्यांच्या नकला करून वाभाडे काढले हा नित्याचाच खेळ झाला. त्यातून निष्पन्न काहीच होत नाही तो फक्त जनतेचा टाईमपास होतो. राज ठाकरे यांची सभा म्हणजे लाखांचा जनसमुदाय विचारांचे सोने व विकासाची ब्ल्यु प्रिंट जी सध्या बासनात गुंडाळून ठेवली आहे. त्याचा मात्र विसर पडतो. वसंत मोरेंसारख्या खंद्या समर्थकाची पक्षातून हकालपट्टी करून दुखावले तरी ते समर्थपणे सर्व ऑफर धुडकावून पक्षाशी एकनिष्ठ आहेत तरी त्यांनी जाहीर सभेतून लाखांचा जनसमुदाय जमतो तरी पक्षाला मतदान ते का करीत नाही हि बोच बोलून दाखवली त्यावर रामबाण उपाय काय हे शोधण्यापेक्षा राज ठाकरे विझलेला दिवा विझवणारा दिवा अशी टाळ्यांची वाक्ये घेऊन काय उपयोग आहे. (टाळ्या हल्ली कमी पडायला लागल्या आहेत.) देशात जनता वाढत्या महागाईने त्रस्त आहेत त्याविषयी राज्य सरकार केंद्र सरकार यांना धारेवर धरले असते तर उचित झाले असते. एक आमदार एक नगरसेवक असूनसुद्धा देशभर राज ठाकरे यांचा दबदबा आहे, ही फार मोठी जमेची बाजू आहे. मनसे हि भाजपची सी टीम म्हणून हिणवले जाते. दिवा विझताना मोठा होतो असे म्हणतात ते खोडून काढून राज ठाकरे यांनी स्वबळावर निवडणूक लढवणार असे जाहीर केले. तर सभेला जमलेला लाखांचा समुदाय तीन अंकी उमेदवार निवडून देतील. विझत चाललेल्या दिव्याची मशाल होऊ शकते.

- यशवंत चव्हाण, बेलापूर

लोका सांगे ब्रह्मज्ञान...

भारत व अमेरिका यामध्ये दोन मंत्र्यांच्या गटामध्ये चर्चा झाली. यामध्ये भारताचे विदेश मंत्री जयशंकर व संरक्षण मंत्री राजनाथसिंग तसेच अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँटोनी ब्लिंकन, तसेच संरक्षण मंत्री लायड ऑस्टिन यांचा समावेश होता. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री ब्लिंकन यांनी रशियाकडून तेल खरेदीचा मुद्दा मांडला. अमेरिकेने भारताने रशियाकडून तेल खरेदी करू नये अशी भूमिका यापूर्वी ही घेतली होती. या पार्श्वभूमीवर भारताने अमेरिकेला सुनावले. आमच्या ऊर्जा सुरक्षेसाठी आवश्यक तेवढी ऊर्जा आम्ही खरेदी करतो. मात्र आकडेवारी पाहिल्यास भारत महिनाभरात जेवढे कच्चे तेल खरेदी करतो त्याच्यापेक्षा जास्त खरेदी यूरोपमध्ये रशियाकडून एका दिवसात होते. एकूणच रशियाकडून तेल खरेदी करू नये असे म्हणतानाच युरोपमधील अनेक देश भारताच्या कितीतरी अधिक पटींनी कच्चे तेल खरेदी करतात याकडे अमेरीका का दुर्लक्ष करते? भारत व रशिया यांचे संबंध अनेक दशकापासून आहेत. भारत अनेक संरक्षण सामुग्री रशियाकडून आयात करत असतो. १९७१ च्या बंगला युध्याच्या वेळी रशियाने आपणास भक्कम पाठिंबा दिला होता. अमेरिकेची ही दुट्टपी चाल भारताने ओळखली आहे. रशिया व युक्रेन या युद्धात भारताने आंतरराष्ट्रीय पातळीवर तटस्थ भूमिका घेतल्याने अमेरिका भारतावर नाखूष आहे. वास्तविक अमेरिकेची ही कृती म्हणजे लोका सांगे ब्रह्मज्ञान ... आपण मात्र कोरडा पाषाण या म्हणीप्रमाणे आहे

- शांताराम वाघ, पुणे

स्थलांतरितांचा प्रश्न

नुकत्याच जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार राज्यातील बेघर असणाऱ्या एकूण मुलांपैकी सर्वाधिक बेघर महाराष्ट्रात आहेत.त्या पाठोपाठ गुजरात राज्य आहे. प्रत्येक मुलाला मूलभूत गरजा अन्न, वस्त्र निवारा व शिक्षण मिळणे अपेक्षित असले तरी, या गरजा त्यांना खरोखर मिळतात का? आपल्या कुटूंबासोबत राहणाऱ्या ९ हजार ५३० रस्त्यावर राहणाऱ्या मुलांपैकी ३ हजार ७१९ बेघर मुले एकट्या महाराष्ट्र राज्यात आहेत. राज्यातील वाढत्या विकासाबरोबरच शहरीकरणाकडे असलेला ओढा किंवा आकर्षण आणि रोजगाराच्या अपेक्षेने झालेले स्थलांतर. हे जरी कारण असले तरी, मुंबईतील बेघर मुलांची संख्या उत्तरप्रदेश राज्याच्या तुलनेत कमी आहे. असे एकूण प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. तसेच राज्यातील बेघर मुलांसाठी कार्य करणाऱ्या संघटनांचे विस्तारलेले जाळे सक्षम असल्याने इतर राज्याच्या तुलनेत राज्यातील बेघर मुलांना मदत तत्परतेने व सुलभतेने मिळते. या मुलांमध्ये वयात येणाऱ्या मुलांची संख्या अधिक असून, ही मुले स्थलांतर करीत असतात असे निरीक्षण नोंदविले गेले आहे.डिसेंबर ते जानेवारी दरम्यान ही मुले मुंबई सोडून गोव्

म ह त्त्वा चे

श्री महादेवी मातेच्या उत्सवाचे आयोजन

। रोहा । वार्ताहार ।

हाकेला धावणारी नवसाला पावणारी आदर्शगाव भातसई येथिल श्री महादेवी मातेचा पालखी व यात्रा उत्सव १५ एप्रिल रोजी दुपरी १२ वाजता पालखी मिरवणुकीला भातसई गावातुन सुरुवात होणार आहे. पालखी नतंर झोलांबे कोपरे या गावात जाते त्यानंतर पालखी झोलांबे गाव, लक्ष्मीनगर येथे फिरवून रात्री ७ वाजता आदर्शगाव भातसई गावात घर-ोघरी फिरून मंदिरात जाते. १६ एप्रिल रोजी महादेवी मातेचा यात्राउत्सवाला सुरुवात होते. जिल्ह्यातील व बाहेरून भक्ताचे जनसागर महादेवीच्या यात्रेमध्ये सहभागी होतात. यात्रेचा मुख्य कार्यक्रम गळ लावणे. यावर्षीचा गळ सायंकाळी ५-३० वाजता सुरुवात होणार आहे.

गोमाशीच्या विद्यार्थ्यांचे यश

। पाली/गोमाशी। वार्ताहर।

सुधागड तालुक्यातील नांदगाव येथे केंद्रस्तरीय सांस्कृतिक व मराठी गणित, इंग्रजी विषयावर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन सोमवारी ११ एप्रिल रोजी केले होते. या स्पर्धेत नांदगाव केंद्रातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सांस्कृतिक स्पर्धेतील सामूहिक नृत्य प्रकारात गोमाशी शाळेच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय, तर पोवाडा गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. गोमाशी शाळेतील इयत्ता पहिलीमधील शौर्य सुतार याचा गणित स्पर्धेत प्रथम, तर इंग्रजी स्पर्धेत द्वितीय क्रमांक आला. इयत्ता तिसरीमधील मेघ सायगावकर याचा मराठी व इंग्रजी स्पर्धेत प्रथम क्रमांक आला, तर इयत्ता चौथी मधील अर्णव पवार यांचा इंग्रजी स्पर्धेत प्रथम तर मराठी स्पर्धेत तृतीय क्रमांक आला. या स्पर्धेतील सर्व यशस्वी विद्यार्थी आणि त्यांचे शिक्षक यांचे शाळा समिती गोमाशी तसेच ग्रामस्थ मंडळ गोमाशी यांच्याकडून कौतुक केले जात आहे.

महिला बचतगटाची खाणावळ सुरू

। पोलादपूर । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत हिरकणी महिला ग्राम संघ कापडे बुद्रुक अंतर्गत पोलादपूर तालुक्याच्या ठिकाणी पहिली घरगुती खानावळ ग्राम संघामार्फत सुरू करण्यात आली. यावेळी पोलादपूरच्या नगराध्यक्षा सोनल गायकवाड, कापडे बुद्रुकच्या सरपंच सुवर्णा सकपाळ, पंचायत समितीचे माजी सदस्य यशवंत कासार, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी धनंजय जगताप, कृषीविस्तार अधिकारी सुरवसे, विस्तारअधिकारी चिमाजी हंबीर, शाखा अभियंता अविनाश कांबळे, प्रभाग संघ अध्यक्षा स्मिता साने, महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाचे विकास शिंदे, विशाल चुंबळे, तालुका समन्वयक अवधूत पाटील, सुनील नरवाडे तसेच ग्रामसंघाच्या अध्यक्षा, सचिव, व महिला बचत गटाच्या महिला सदस्यांची उपस्थिती लक्षणिय होती. पोलादपूरचे गट विकास अधिकारी जगताप यांनी उदघाटनपर भाषणामध्ये, अतिशय दुर्गम अशा भागांमध्ये असणारे पोलादपूर ठिकाण व अशा ठिकाणी महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान अंतर्गत ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत असा उपक्रम या भागामध्ये प्रथमच राबविण्यात आल्याबद्दल याचे कौतुक केले.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मौजे जांभुळपाडा, ता.सुधागड, जि.रायगड येथील जमीन मिळकत.

मिळकतीचे वर्णन

जमिन मालकाची नावे	गाव	गट/स.नं	क्षेत्र हे.आर.	आकार रू.पैसे
वैभव प्रसन्न लोढा	जांभुळपाडा	१०१	१-०७-००	०-७५

सदर जमिन व त्यातील इमारती...

गट नं	ग्रामपंचायत मिळकत नं	मिळकत वर्णन	क्षेत्र चौ.मी /चौ.फुट	इमारत कर	दिवाबत्ती रूपये	आरोग्य कर रूपये	एकूण रक्कम रूपये
हरनेरी अंतर्गत रस्ता १०१	१३४८	इतर पक्के घर (दगड विटांचे चुना किंवा सिमेंटचे घर)पहिला मजला (लांबी '१३X रूंदी १३')	१५.७ (१६९ चौ. फुट)	१६४	२०	२०	२३९
हरनेरी अंतर्गत रस्ता १०१	१३४९अ	आर सी सी पद्धतीचे घर पहिला मजला (लांबी '६० X रूंदी ६०')	'३३४. ४५ (३६०० चौ.फूट)	९३६ ०	६०	६०	९५१५
हरनेरी अंतर्गत रस्ता १०१	१३४७	इतर पक्के घर (दगड विटांचे चुना किंवा सिमेंटचे घर)पहिला मजला (लांबी '१३X रूंदी २६')	३१.४ (३३८ चौ फुट)	३२९	४०	४०	४४४
हरनेरी अंतर्गत रस्ता १०१	१३४९ब	इतर पक्के घर (दगड विटांचे चुना किंवा सिमेंटचे घर)पहिला मजला (लांबी '१००X रूंदी ३०')	२७८.७१ (३००० चौ. फुट)	२९२ ५	६०	६०	३०८०

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन, जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबीची पूर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक : १४/०४/२०२२

सही/-
खरेदीदारांचे लेखक
श्री.सरदारमल जोरावरमल राठोड स्टँम्प व्हेंडर
६९९ जमना निवास, पाली ता.सुधागड, जि.रायगड
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक सौ.शामल शिवाजी कांबळे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशीलवार वर्णन पुढीलप्रमाणेः-

मौजे:तिवरे, ता.कर्जत, जि.रायगड

स.नं	हि.नं	एकूण क्षेत्र(हे.आर.पॉ.)	आकार(रू.पै.)
५७	५	०-४०-५०	७-२५

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १४/०४/२०२२
मोबा.९८२२६९११०९

ॲड.निलेश कान्हु मोरे
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

PUBLIC NOTICE

Before The 2nd motor Accident Claim Tribunal
At: Ankleshwar

M.A.C.P.No.227/2015
Exh-13

Applicant :- (1) Lalitadevi Arunkumar sign + 3
Adv. A.K.parekh

V/s

Opponents:- 1. Rammanohar ramdhar Tiwari C/O Hiren A Joshi
Add- C/1057, First FL Bima Complax, Klmboli
Panwel, Dis.Raigadh. M.H.410218

Whereas the applicant has filed claim petition in thai Tribunal for compensation of Rs. 30,00,000/- for, G.I.D.C Police Station I 175/2015 and notice of the notice of this Tribunal has been returned unserved against above apponents.

This public notice issued by the tribunal, let opponent No.1 make notice of /this claim it will be heard by the Tribunal on 24/06/2022 at 10.30 A.M if does not appear and file their defence the claim will be decided exparte against him

given under my hand and the seal of court, this 13 day of APRIL, 2022

Prepare By Sd/- Assistant
Comp.By Sd/- Superintendent
Sd/- **Registrar Motor Accident Claim Tribunal, ANKLESHWAR.**

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत मालमत्तेसंदर्भात १.कैदजोहार एझुद्दीन, २. इब्राहिम कैदजोहार एझुद्दीन, ३. ताहेर कैदजोहार एझुद्दान व ४ अलीअसगर कैदजोहार एझुद्दीन यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत.

कोणाही व्यक्तीचा सदर मालमत्ता वा तिच्या कोणत्याही भागाविरोधात वा संदर्भात विक्री, अभिहस्तांकन, गहाण, न्यास, धारणाधिकार, भेट, प्रभार, ताबा, उत्तराधिकार, भाडेकरार, वहिवाट, देखभाल, सुविधाधिकार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंदर्भात अधोहस्ताक्षरितांना सदर प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या आत लिखित स्वरूपात सूचित करावे अन्यथा दावे, काही असल्यास, ते अधित्यागित समजले जातील.

वरील संदर्भित अनुसूची

पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - एकूण मोजमापित ७.५ एकर अर्थात मोजमापित १२.८२ एकर (५ हेक्टर व १९ आर) क्षेत्रफळाच्या भूखंडाचा भाग बनत असलेला मोजमापित ४ एकर जमिनीचा भूखंड, गट क्र. १५९ (जुना गट क्र. १६० व जुना सर्व्हे क्र. ६१, हिस्सा क्र. १ - ए, गट क्रमांकांध्ये एकत्रिकरण योजनेपूर्वीचा), रु. ४.८० मूल्यावर करनिर्धारित + मोजमापित ८.६७ एकर (३ हेक्टर व ५१.१ आर) क्षेत्रफळाच्या भूखंडाचा भाग गनत असलेला मोजमापित ३.५ एकर क्षेत्रफळाचा जमिनीचा भूखंड, गट क्र. १५२ (जुना गट क्र. १५३ व जुना सर्व्हे क्र. ५६, हिस्सा क्र. १ - ए, गट क्रमांकामध्ये एकत्रिकरण योजनेपूर्वीचा), रु. ४.६० मूल्यावर करनिर्धारित, दोन्ही गाव झिराड, जिल्हा व नोंदणीकरण जिल्हा रायगड व नोंदणीकरण उपजिल्हा व तालुका अलीबाग येथील, रायगड जिल्हा परिषद व अलीबाग पंचायत समिती हद्दीतील, झिराड ग्रामपंचायत हद्दीतील.

मुंबई, दि. १२ एप्रिल, २०२२

जेसन वास
भागीदार
पी. वास ॲन्ड कं., वकील व सॉलिसिटर्स
ए/१, लिबर्टी, १ ला मजला, १८, हिल रोड, वांद्रे (प.), मुंबई - ४०० ०५०.
ई-मेल : pvas1979@gmail.com

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे कोर्लई, ता.मुरूड जि.रायगड येथील खालील नमूद असलेली जमिन मिळकत. सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांनी विक्री व्यवहारास काढलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीशी विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिलेले आहे. त्या संबंधीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर	आकार रू.पै.
कोर्लई ता.मुरूड	४७/८	०-६१-०० पो.ख.०-०४-०० एकूण ०-६५-०	१.१३

वर वर्णन केलेली मिळकत या जाहीर नोटीसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात इतर कोणाचीही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे येणेजाणेचे मार्ग, वारसाहक्क आदी कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास वा त्यांचे वरील मिळकतीच्या सदर विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांच्याकडे कळवावी. येणेप्रमाणे सदर विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील. व त्यानंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

दि. १३/०४/२०२२

ॲड.मोहनिश मनोहर ठाकूर
रा.चिंचघर, पो.बोर्ली, ता.मुरूड, जि.रायगड
मो.नं.८०८००१९११५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली स्थावर मिळकत श्री.महेश वसंत सावंत, रा.शिवराम पॅलेस, जोगळेकर नाका,अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीची मिळकत असून सदरची मिळकत आमचे अशिलांनी त्यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

मौजे गोंधळपाडा, ता.अलिबाग जि.रायगड येथील भुमापन क्र.व उपविभाग १/६/अ/२ जुना सर्व्हे नंबर ३८ हिस्सा नं.६अ पैकी बिनशेती भुखंड क्रमांक २ क्षेत्र २८० चौ.मी आकार रू.२८.०० ही मिळकत व सदर मिळकतीमध्ये असलेले ग्रुप ग्रामपंचायत वेश्वी मालमत्ता क्रमांक ५०८ आर.सी.सी.घर तळमजला व पहिला मजला ही मिळकत.

वर नमूद मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बोजा, बक्षीस, मृत्यूपत्र, भाडेपट्टा, जप्ती लीन, लिएन, अन्नवस्त्र, पोटगी, वारसाहक्क अथवा अन्य प्रकारचा कोणताही कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांच्या आत त्यासंबंधातील लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे त्यांचे नमूद पत्त्यावर कळवावी.

या नोटीसमध्ये नमुद केलेल्या मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात न कळविल्यास सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजून तसेच सदर मिळकतीशी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व सदरच्या व्यवहारानंतर कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांकः १३.०४.२०२२

सही/-
ॲड.जयवंत ह घरत
एम.ए.एल.एल.एम
बी/१०२ 'चित्रा तारांगण' महर्षी कर्वे रोड
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांने मौजे-कुशिवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री.अनंता झिल्या पाटील, श्री.ऋषिकेश अरूण गायकवाड व श्री.मारूती झिपा ठोंबरे यांच्याकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असून सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार रू.पै.
२३	-	०.३७.७० पैकी ०.१८.००	१.३६

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशिल व जमीन मालकांच्या दरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्यूपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशिल सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दिनांक : १४/०४/२०२२

वकील
ॲड.सचिन संजय सुर्वे
पत्ताः नाथ सदन, आमराई रोड,
ता.कर्जत जि.रायगड, ४१०२०१.
मो.नं.९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांने मौजे-कुशिवली, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री.ऋषिकेश अरूण गायकवाड व सौ.विद्या ऋषिकेश गायकवाड यांच्याकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असून सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार रू.पै.
३१	२/ब	०.५८.७० पैकी ०.४०.७०	२.८४

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशिल व जमीन मालकांच्या दरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्यूपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशिल सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दिनांक : १४/०४/२०२२

वकील
ॲड.सचिन संजय सुर्वे
पत्ताः नाथ सदन, आमराई रोड,
ता.कर्जत जि.रायगड, ४१०२०१.
मो.नं.९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.मनेश नीलकंठ घरत, रा.४४९, वरचे ओवळे, पारगाव, पनवेल, रायगड ४१०२०६ यांनी खाली नमूद केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे पाचखडकवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत.

स.नं	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पै.)	भोगवटाधारकाचे नाव
१८/१/अ	०.१८.०० पो.ख.०.०२.००	०.१५	नुरजहा नाज खान
	एकूण ०.२०.००		

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या २१ (एकवीस) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक : १४/०४/२०२२

सही/-
ॲड.उषा जे.कांबळे
कर्जत, 'पुष्प विमल' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो.नं. ७३८५००४८०६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे आक्षी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.अनिल नारायण पाटील, रा.शिवाजी नगर, रूम नं.५, यशमंगल सोसायटी, चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र.व उपविभाग क्र.	क्षेत्र(हे.आर.)	आकार(रू.पै)
आक्षी ता.अलिबाग	१५२/२/२	०-०४-९० पो.ख.०-००-२० एकूण ०-०५-१०	१.५८

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून आठ दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष व रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरून माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १३/०४/२०२२

सही/-
ॲड.विवेक रमेश साळवी
मा.दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, शॉप नं.५,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९२७०२०००६३.

जाहीर नोटीस

सर्वांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, निम्ननिर्दिष्ट मालमत्ता जमीन मालकांनी त्यांचे मालकीवहिवाटीची व निर्वेध आहे असा निर्वाळा दिला. मिळकतीचे सर्व हक्क अधिकारसुद्धा मिळकत कायम खरेदी देणेबाबत त्यांची आमचे अशिलांजवळ बोलणी चालू आहेत. तरी व्यवहारास कायदेशीर बाधा राहू नये व टायटल तपासणीचा भाग म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. तरी सदर मिळकतीसंदर्भात अन्य कोणास गहाण, दान, बक्षीस, लीन, लीज, अन्नवस्त्र, पोटगी, अदलाबदल, हवा, उजेड, जाणेयेणेचा मार्ग, इजमेंट, वहिवाट, मृत्यूपत्र इ. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार असलेस त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी कळवावे. अन्यथा सदर नोटीस मुदत अखेर कथित हक्क अधिकार जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहित धरुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारे हरकतींचा विचार केला जाणार नाही.

वरीलप्रमाणे नोटीस प्रसिद्ध करणेस येत आहे.

अ) मिळकतीचे वर्णन- मौजे पळसगाव बुद्रूक, ता. माणगाव, जि. रायगड येथील मिळकत.

तिचे वर्णन खालीलप्रमाणे.

गट नं.	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकार (रु.पैसे)	जमीन मालकाचे नाव
१३९/१/ब	०-२४-००	०.११	सुभाष विश्वनाथ म्हामुणकर वगैरे ४

माणगाव
दिनांक : १३/०४/२०२२

सही/-
ॲड. राहूल प्र. ओक
'मानस' मुंबई-गोवा हायवे
पो.ता. माणगाव, जि. रायगड
मो.नं. ८८८८३७३००५
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक शिवाजी कृष्णा म्हसे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले. सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रु.पै.)
५६	१९	०-७९-००	०-८०

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसात नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १४/०४/२०२२

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
किशोर तुकाराम देशमुख
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, मौजे ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली बिनशेती प्लॉट मिळकत आमचे अशिलांनी विद्यमान मालक अनुपम दासगुप्ता व रोमीता अनुपम दासगुप्ता यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर बिनशेती प्लॉट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

मौजे- ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

सर्व्हे नंबर	प्लॉट नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
१०२	३१८	२४२.००	२४-२०

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्य

■ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समवेत सुरबानाना टिपणीस, भाई चित्रे, नाना पाटील, शंकरराव खुळे, रावसाहेब भिलारे आदी कार्यकर्ते.

बाबासाहेबांची प्रेरणा

चरीचा शेतकरी संप

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२७ मध्ये महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले आणि कोकणासह संपूर्ण महाराष्ट्रात क्रांतीची ठिणगी पडली. ही ठिणगी विषमतेविरुद्ध होती. समतेची, न्याय्य हक्कांची होती. चरीच्या शेतकरी संपाची प्रेरणा या घटनेत दडलेली आहे. चरी गावाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पदस्पर्श झाला आणि शेतकरी-कामगारांचे नेते नारायण नागू पाटील यांच्या धारदार नेतृत्वाला अधिकच झळाली आली. संपकरी शेतकऱ्यांच्या दृढ निश्चयाला जणू वज्रकवच मिळाले. शेतकऱ्यांचा चरी येथील जगातील एकमेव प्रदीर्घ संप यशस्वी ठरला. यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा, आशीर्वाद आणि मार्गदर्शनही कारणीभूत आहे. सर्वांना समान न्याय, समता व बंधुत्वाच्या विचारांची प्रेरणा देऊन देशाला घटनात्मक दिशा देणारे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती १४ एप्रिल रोजी आहे. त्यानिमित्त हा विशेष लेख.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रथम पाय पडले ते १६ डिसेंबर १९३४ साली रेवस धक्क्यावर. (नंतर अनेकदा ते धरमतर धक्क्यावरुन पोयनाड मार्गे आले. तेव्हा धरमतर पूल नव्हता) भाऊच्या धक्क्यावरुन समुद्रमार्गे बोटीने त्यांना भाई अनंतराव चित्रे घेऊन आले होते. निमित्त होते शेतकरी संपानिमित्त आयोजित केलेल्या चरी येथील कुलाबा जिल्हा शेतकरी परिषदेचे. या परिषदेचे संघटक शेतकरी संपाचे नेते नारायण नागू पाटील होते. या परिषदेचे अध्यक्ष होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ४३ वर्षांचे होते आणि नारायण नागू पाटील यांचे वय होते ४२ वर्षे. एक वर्षांनी लहान असलेले नारायण नागू पाटील हाडाचे शिक्षक होते, आमदार म्हणूनही त्यांची कारकीर्द लक्षवेधक ठरली होती. अनेक शेतकरी चळवळीत सहभाग घेतला होता, नेतृत्वही केले होते. या नेतृत्वाला चरीच्या शेतकरी संपाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पाठबळ मिळत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर खारेपाटात येणार म्हणून येथील बहुजनांना प्रचंड आनंद झाला होता. त्यामुळे रेवस धक्क्यापासून सारळ, हाशिवरे, नारंगी, वाटेत जी-जी गावे आहेत, तेथे तेथे शेतकरी-कष्टकऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हार-तुरे देऊन मोठ्या उत्साहाने स्वागत केले. त्यांना भाई अनंतराव चित्रे पेझारी येथे घेऊन आले. पेझारी नाक्यावर एका घरात तात्पुरते भाड्याने राहणाऱ्या नारायण नागू पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. तेथील पाहुणचार स्वीकारल्यानंतर ते जायला निघाले. तेव्हा पेझारी येथे सुमारे २ हजार शेतकरी जमले आणि त्यांनी त्यांची नारायण नागू पाटलांसह भव्य मिरवणूक काढली. ही मिरवणूक चरी गावातही फिरली आणि सभास्थानी आली. सभास्थान शेतकरी, कष्टकऱ्यांनी खचाखच भरलेले पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेतकरी संप कोणत्या निर्धाराने लढवला जातोय हे लक्षात आले. समोर बसलेल्या दुबळ्या अंगकाठीच्या शेतकऱ्यांमध्ये इच्छाशक्तीचे कठीण कवच असल्याचे त्यांनी हेरले. त्यांनी शेतकरी-कामगारांचे नेते नारायण नागू पाटील यांना म्हटले, 'तुमचा एक एक शेतकरी असा आहे, की एका शेतकऱ्याला या भूमीत पेरले, तर त्याचे लाख शेतकरी या भूमीतून निर्माण होतील!'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे उद्‌गार ऐकून नारायण नागू पाटलांना आपल्या संपकरी शेतकऱ्यांचा अभिमान वाटला. समोरचे शेतकरी घोषणा देत होते, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय! चरी शेतकरी संपाचा विजय असो!' या शेतकऱ्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्याला कारणही तसेच होते. या परिषदेच्या दोन दिवस अगोदर कोकणातील खोती-सावकारीविरुद्धच्या लढ्यातील नेते भाई अनंतराव चित्रे, सुरबानाना टिपणीस, श्यामराव परुळेकर हे चरीला आले होते. परिषदेची जय्यत तयारी झाली होती, परंतु तेथील सावकारांचा परिषदेचा फज्जा उडविण्याचा डाव होता. त्यांनी परिषदेच्या आदल्या दिवशी अफवा पसरविली की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिषदेसाठी येणार नाहीत. संपकरी शेतकरी हिरमुसले. तेव्हा भाई अनंतराव चित्रे हे तातडीने स्वत: मुंबईस गेले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भेट घेतली आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिषदेला येणार आहेत' अशी तार रात्री १० वाजता चरीला आली आणि शेतकऱ्यांसह सर्वांचा जीव भांड्यात पडला. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपल्यासमोर आणि आपल्यासमवेत पाहून शेतकरी-कष्टकऱ्यांना आपल्या संपाचं चीज झाल्याचं वाटत होतं.

या चरीच्या शेतकरी परिषदेच्या वेळी दोन्ही दिवस अस्पृश्य आणि स्पृश्यांच्या जेवणाच्या पंगती एकत्रच उठत होत्या. त्यामुळे उच्चवर्णीय सावकारांनी 'नारायण नागू पाटील आगरी जात बाटवत आहेत' अशी आवईही उठवली. पण त्यांच्या कोल्हेकुईकडे कोणी लक्ष दिले नाही. सहभोजन-सहवावराने अस्पृश्यतेचे सनातनी भूत या भूमीत गाडण्यात आले. यापूर्वी असे कधी झाले नव्हते. आपल्या न्याय्य हक्कांबरोबरच सामाजिक समतेचाही जागर या परिषदेतून झाला. उक्ती आणि कृतीचा तेथे संगम पहायला मिळाला. डॉ. बाबासाहेबांचा वावरच पवित्र-अपवित्र या संकल्पनांना धक्का देणारा होता. त्याचे प्रतिबिंब तेथील स्पृश्य-अस्पृश्यांमध्ये उमटले होते. माणूस म्हणून ही मंडळी शेतकरी संपात वावरली आणि प्रतिकूल परिस्थितीतही सावकारशाहीविरुद्ध त्यांची एकजूट राहिली. आपल्याला जशी माणसे हवी आहेत, तशी माणसे येथे घडत असल्याचे पाहून त्यांना आनंद वाटला. ते नारायण नागू पाटील यांना म्हणाले, 'आप्पा, तुमचा शेतकरी-कामगार सुधारणावादी आहे. त्यांना फक्त मार्गदर्शनाची गरज होती. तुमच्या रुपाने ते मिळतेय. तुमचा संप यशस्वी होईलच, पण या संपाच्या निमित्ताने या जिल्ह्यातूनही अस्पृश्यतेचा पगडा नाहीसा होईल असे मला वाटतेय.'

- उमाजी केळुसकर, मोबा. ९०११३६०१६८

शेतकरी संपाची पार्श्वभूमी

अलिबाग-पेण रस्त्यावर पळीनजिक चरी हे गाव आहे. सावकारांची शेती कसायची आणि त्यातून जे काही मिळेल त्यावर वर्षभर कुटुंबाची उपजीविका करायची अशी चरी आणि सभोवतालच्या गावातील वर्षानुवर्षे रित होती. जमिनीमध्ये भात आणि अन्नधान्य पिकवून ७५ टक्के माल सावकारांना द्यायचा शिवाय पेंढापाण्याच्या रूपानंही काही उत्पन्न शेतकऱ्यांना द्यावं लागायचं. म्हणजे वर्षभर शेतीत काबाडकष्ट करुनही शेतकऱ्यांच्या हाती काहीच उरायचं नाही. त्यामुळं वर्षातले अनेक दिवस कुळांना उपाशीपोटीच जीवन जगावं लागायचं. हे चरीच्या परिसरातच घडत होतं असं नाही. साऱ्या कोकणातच खोत, जमीनदार, सावकारांकडून कुळांवर अन्याय होत होते. त्याविरुद्ध कुळांमध्ये मोठा असंतोष होता. संताप होता. या संतापातून १९०५ मध्ये पेण तालुक्यातील वढाव गावातील शेतकऱ्यांनी पहिला संप केला. या संपाचे फलित असे होते की, १९२७ मध्ये 'कोकण प्रांत शेतकरी संघाची' स्थापना झाली. या संघाच्या माध्यमातून कोकण प्रांतातील आगरी, कोळी, कराडी, कुणबी, मराठा, तेली, माळी, भंडारी, आदिवासी व अस्पृश्यांना एकत्र करीत त्यांची मोट बांधण्याचे काम करण्यात आले. त्यांच्यात खोती-सावकारी पद्धतीविरोधात वन्ही पेटवण्याला. त्यानंतर पेण येथे २५ डिसेंबर १९३० मध्ये पहिली कुलाबा जिल्हा शेतकरी परिषद भरवण्यात आली. याचा परिणाम असा झाला की, नारायण नागू पाटील यांच्यावर भाषणबंदी लादली गेली. भाषणबंदी संपताच नारायण नागू पाटील आणि अनंतराव चित्रे यांनी २७ ऑक्टोबर १९३३ रोजी चरी परिसरातील पंचवीस गावातील शेतकऱ्यांची सभा चरी इथं लावली. सरकारधार्जिण्या, खोत-सावकार-जमीनदार धार्जिण्या वृत्तपत्रांनी शेतकरी संपाविरोधात बातम्या देण्यास सुरुवात केल्यानंतर शेतकरी संपाच्या कथा, व्यथा आणि वस्तुस्थिती लोकांसमोर यावी म्हणून ७ जून १९३७ साली नारायण नागू पाटील यांनी भगवान गौतम बुद्धांचे 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हे ब्रीद घेऊन कृषीवल साप्ताहिक सुरु केले.

खोती निर्मूलन कायदा

१९३६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापनाही केली. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजदूर पक्षाच्या १४ आमदारांच्या पाठिंब्यावर १७ सप्टेंबर १९३९ रोजी खोती पद्धत बंद करण्याचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले. त्यानंतर सरकारला जाग आली. मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेरांच्या मंत्रिमंडळातील महसुलमंत्री मोरारजी देसाई यांचा लवाद सरकारनं नेमला. मोरारजी चरीला आले. दोन्ही गटांशी त्यांनी चर्चा केली आणि उभयमान्य तोडगा सुचविला. शेतकऱ्यांच्या बऱ्याच मागण्या मंजूर केल्या गेल्या. त्यामुळे २७ ऑक्टोबर १९३३ पासून १९३९ पर्यंत ६ वर्षे जमीन न कसता शेतकऱ्यांनी केलेला संप अखेर संपुष्टात आला. या आंदोलनाचे फलीत म्हणजे १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यावर संपूर्ण भारतात अत्यंत प्रगत कृषीविषयक कायदे महाराष्ट्र राज्याने केले. खोती निर्मूलन अधिनियम १९४९ मध्ये लागू करुन खोती पद्धतीचा अंत केला. त्यामुळे कुलाबा जिल्ह्यातील सुमारे सव्वा लाख एकर जमीन खोत-सावकार- जमीनदारांच्या मगरमिठीतून मुक्त झाली. पुढे १९५७ मध्ये कुळकायदा आला व 'कसेल त्याची जमीन' हे तत्व रुढ झाले. पहिल्या टप्प्यात कुलाबा जिल्ह्यातील ८२,८३० शेतकऱ्यांना (कुळांना) जमिनीचे मालकी हक्क मिळाले. संपत्तीचे समन्यायी वाटप झाले. अर्थात यामागे चरीच्या संपकरी शेतकऱ्यांचा त्याग आहे. नारायण नागू पाटलांचे नेतृत्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आशीर्वाद आणि प्रेरणा आहे.

पीडितांच्या हक्कांसाठी आजन्म लढा

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती १४ एप्रिल रोजी संपूर्ण भारत देशामध्ये साजरी करण्यात येत आहे. अखंड मानवजातीसाठी त्यांनी जे कार्य केलेले आहे त्याला इतिहासामध्ये तोड नाही. भारतीय विज्ञान शास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ व समाज सुधारक म्हणून त्यांनी केलेल्या कार्याबरोबर बौद्ध चळवळीला त्यांनी प्रेरणा दिली आहे आणि समाजामध्ये होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारणे, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या न्याय हक्काचे समर्थन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती संपूर्ण देशभर साजरी केली जात असताना या दिवसाला समानता दिवस आणि ज्ञानदीप दिवस म्हणूनही साजरा करण्यात येतो. कारण आयुष्यभर समानतेसाठी लढा देणारे डॉ. आंबेडकर यांना समानता तसेच न्यायाचे प्रतीक मानले जाते. डॉ. आंबेडकर यांचा वाढदिवस त्यांचे जवळचे अनुयायी सदाशिव रणपिसे यांनी १४ एप्रिल १९२८ मध्ये पुण्यामध्ये प्रथम साजरा केला होता. अशा या थोर पुरुषाचा जन्म मध्यप्रदेशातील इंदुर जवळ असलेल्या महू या गावामध्ये १४ एप्रिल १८९१ रोजी झाला, यानंतर बाबासाहेबांचे वडील रामजी सुभेदार हे मुलांच्या शिक्षणासाठी मुंबईमध्ये आले. रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात असलेल्या आंबडवे हे त्यांचे मुळगाव, यागावात सकपाळ नावाची बहुतांशी कुटुंबे राहत होती बाबासाहेबांचे नाव देखील सकपाळ होते. *(पान ७ वर)*

रायगडावर डॉ. बाबासाहेब

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सच्चे शिवप्रेमी होते. महाडला जेव्हा चवदार तळ्याचा सत्याग्रह झाला तेव्हा डॉ.बाबासाहेबांनी रायगडाला आवर्जून भेट दिली होती. महाडची सत्याग्रह परिषद दि. २५ ते २७ डिसेंबर १९२७ रोजी भरविण्यात आली होती. त्या परिषदेची पूर्वतयारी करण्याकरीता अनंत विनायक चित्रे यांची नियुक्ती करण्यात आली होती. या परिषदेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व दीडदोनशे मंडळी दि.२४ डिसेंबर रोजी मुंबईवरून सकाळी पद्मावती बोटीने निघाले. संध्याकाळी ते हरेश्वर बंदरात येऊन पोहोचले. कोळमांडला येथे मुक्काम करून दुसऱ्या दिवशी २५ डिसेंबरला सकाळी अल्पोपहार झाल्यावर सर्व मंडळी दासगावला जाण्यासाठी अंबा बोटीत चढली. अंबा दुपारी दासगाव बंदरात पोहोचली. तेथे सुमारे तीन हजार लोक महाडला जाण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मुंबईकरांची वाट बघत बसले होते. दासगाव बंदरापासून महाड सुमारे पाच मैल आहे. डॉ. आंबेडकर तेथे पोहोचताच सर्वांना आनंद झाला. तिथून पाच जणांची एक रांग करून जयघोष करत मिरवणूक सत्याग्रहाच्या छावणी जवळ आली.

चवदार सत्याग्रह झाल्यावर डॉ.बाबासाहेबांनी ठरविले की रायगड किल्ल्याला भेट द्यायची. बाबासाहेबांनी रायगडला भेट दिली तेव्हा ते बॅरिस्टर झाले होते. एखादा उच्चशिक्षित माणूस छत्रपती शिवाजी महाराजांच्या ओढीने रायगडावर जातो हे मोठे त्याकाळचे वैशिष्ट्य आहे. बाबासाहेबांनी रायगडला भेट दिल्यावर तेथील कुलाबा समाचार, सनातनी विचारधारेच्या वर्तमान पत्रांनी त्याकाळी बाबासाहेबांची रायगडवरची स्वारी अशा मथळ्याचे वर्तमानपत्रात लेख छापून आले आहेत. तसेच त्या लेखामध्ये बाबासाहेबांनी रायगड बाटविला असेही छापून आले होते. जेव्हा बाबासाहेब रायगडावर गेले तेव्हा तेथे जाण्यासाठी साधा रस्ताही उपलब्ध नव्हता. नाते गावापर्यंतच रस्त्याची सोय होती. त्यामुळे नात्यापासून रायगडपर्यंत बाबासाहेब पूर्णपणे चालत गेले. संध्याकाळी ५ ते नात्याला पोहोचले त्यांनतर रात्री साडेनऊला ते पाचाडला पोहोचले. व दुसऱ्या दिवशी लवकर उठून ते आठच्या दरम्यान रायगडावर पोहोचले. अनेक अडचणींचा सामना करून बॅरिस्टर झालेले बाबासाहेब रायगड किल्ल्यावर जातात, आणि छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन करणे हीच खूप मोठी गोष्ट होती. फक्त रायगडला भेट देण्यासाठी बाबासाहेब गेले नव्हते तर चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहनही यावेळी करण्यात आले. साडेतीनशे वर्षापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी धार्मिक सत्तेला लाथ मारत स्वतःचा राज्यभिषेक करून *(पान ७ वर)*

माणगावच्या आमराईतील सभा



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयीचा आढावा घेताना आपणास हे मान्य करावेच लागते की, डॉ. आंबेडकरांनी भारतातील समाजव्यवस्थेत असणारी घाण कमी केली. अंधारी प्रदेशात झोपडपट्टीत प्रकाश दिला. मातीच्या पुतळ्यात जीव फुलविला आणि एका मानवी इतिहासाची चळवळ देशात सुरू केली याची नोंद जगाला घ्यावी लागली. हा एक देशप्रेम प्रांजळ आविष्कार होय.

स्वातंत्र्यानंतर मंत्रिपद भूषविताना डॉ.बाबासाहेबांनी स्वार्थाला कधीच थारा दिला नाही. सदैव ते जनतेच्या कल्याणासाठी अथक प्रयत्नशील राहिले. त्यांनी राष्ट्रहितबुध्दी कधीच सोडली नाही. राष्ट्रातील उच्चपदी काम करीत असता ज्यांचे नातलग श्रीमंत व धनाढ्य झाले नाहीत. असे आदर्श मंत्र्याचे नाव सांगावयाचे झाल्यास डॉ. आंबेडकरांचे पुण्यशील नाव सांगता येईल. रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील जुने माणगाव काळ नदी पुल याठिकाणी अंबराईमध्ये महाड चवदार तळे सत्याग्रह करण्यासाठी माणगावच्या जनतेची बैठक सभा घेतली. त्याच जागेवर माणगावकर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करू लागले. त्याच पुण्यभूमीवरील बौद्धजन पंचायत समिती माणगाव तालुक्याच्या वतीने आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन रवींद्र मोरे व लहू सकपाळ यांनी केले होते.

येथील धर्म संस्थेत वाहणाऱ्या गटार गंगेला शुद्ध करण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. त्यांनी येथील समाजाला ठणकावून सांगितले, हिंदू कोड बिल तयार करून समानतेवर आधारित हिंदू धर्माला विश्वधर्म बनवण्याची योजना आखली. परंतु समानतेच्या मारेकऱ्यांना ती कशी रुचणार! आज देशात स्त्रियांचा दर्जा आणि सामाजिक बदल दिसून येतात याचे सर्व श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचेच होय. हिंदू म्हणून जगणाऱ्यांना पाणी पिण्यास सक्त मनाई होती. त्यांनी हे बदल घडवून हक्क मिळवून दिले. सन १९३० च्या गोलमेज परिषदेत त्यांनी इंग्रजांची कान उघडणी केली. कोणत्याही राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याचा काहीच अधिकार नाही. इंग्रजांचे राज्य जाऊन त्या जागी भारतीय लोक प्रशासन प्रस्थापित करावे या मुद्देसूद भाषणामुळे देशप्रेमामुळे सयाजीराव गायकवाड यांनी मुक्त कंठाने स्तुती केली व सयाजीराव बेहोश होऊन त्यांनी फार मोठी मेजवानी दिली.

खरोखरच भारतातून स्वातंत्र्याची मागणी करणे, उठाव करणे आणि इंग्लंडला जाऊन प्रत्यक्ष ब्रिटिशांच्या घरीच स्वातंत्र्याची डरकाळी फोडणे यात फार अंतर आहे.

गांधीजी या भाषणाचा वृत्तान्त वाचून आंबेडकरांना म्हणाले, डॉ.तुम्ही सच्चे देशप्रेमी आहात हे मला आज जाणवले. डॉ.आंबेडकरांनी केव्हाही कोणाच्याही राग लोभाची पर्वा केलेली नाही. त्यांनी अवेशउक्त प्रतिपादन तर्कशुद्ध विचार मांडले. दि.८ ऑगस्ट १९३० रोजी नागपूर येथे भरलेल्या बहिष्कृत वर्गाच्या अध्यक्ष पदावरून त्यांनी अस्पृश्य समाजाचे ध्येय स्वराज्य आहे अशी घोषणा केली. अस्पृश्य समाजाच्या दैनाव्यवस्थेचा शेवट ब्रिटिश राज्यात होणार नाही तर स्वराज्याच्या घटनेद्वारा आपल्या हाती राजकीय अधिकार आल्यानेच होईल अशी त्या परिषदेत त्यांनी राष्ट्रवादी घोषणा केली. असे हे थोर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन!

- सलीम शेख
मोबा. ९४२३३८२७८९

ऋणानुबंध महामानवाशी

दासगाव जनता प्रगतीशील संघ मुंबई संस्थेच्या माजी अध्यक्षा आणि विद्यमान कार्याध्यक्ष कॉम्रेड देवयानी सत्येंद्र मोरे या लग्नाअगोदरच्या देवयानी भातणकर. भातणकर या कुटुंबातील अत्यंत हुशार मुलगी होती. तेव्हाच्या काळी त्या मॅट्रिकची परिक्षा चांगल्या गुणांनी पास होणाऱ्या पहिल्या मागासवर्गीय विद्यार्थिनी होत्या. देवयानी भातणकर यांच्या भातणकर कुटुंबियांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्व कालखंडापासून सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीशी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी घनिष्ठ संबंध होता. देवयानी मोरे यांचे काका रामकृष्ण भातणकर हे आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचे पनवेल मधून निवडून आलेले आमदार होते. तर दुसरे काका जगन्नाथराव भातणकर हे आंबेडकरांच्या म्युनिसिपल मजदूर युनियनचे प्रमुख नेते होते. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पनवेलला भातणकरांकडे नियमित येणे होत असे. त्यामुळे बालवयातच देवयानी मोरे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सहवासही लाभला होता.

देवयानी यांचे वडील सुभेदार यशवंतराव भातणकर हे पनवेलचे नगरसेवकही होते. या सर्व वातावरणामुळे देवयानी यांना समाजकार्याबद्दल आस्था वाटू लागली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शेवटच्या म्हणजेच १९५५-५६ च्या दरम्यानच्या काळातील आठवण देवयानी मोरे नेहमी सांगायच्या की, एकदा डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्या गाडीने पुण्याला जायला पनवेल मार्गे निघाले होते. तेव्हा त्यांनी आपली गाडी स्टॅन्ड समोरील मोठ्या रस्त्यावर थांबविली आणि रस्त्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या सुभेदार वाड्यातील भातणकरांच्या घरी आपल्या ड्रायव्हरला पिण्याचे पाणी आणण्यासाठी पाठवले. तेव्हा घरातील देवयानी आणि धाकटी बहिण उषा या पाण्याचे दाने तांबे आणि पेले घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना पेल्यातून पाणी दिले. त्यावेळी बाबासाहेब खूप थकलेले दिसून येत होते.

तसेच त्या म्हणाल्या माझे लग्न २३ डिसेंबर १९५६ रोजी पनवेलच्या सुभेदार वाड्यात बौद्ध पद्धतीने लागले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला बौद्ध धर्मांतर केल्यानंतर, बौद्ध पद्धतीने झालेला तो पहिलाच विवाह होता आणि तोही बाबासाहेबांचे जवळचे सहकारी व ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाचे प्रमुख संघटक कॉ. आर.बी.मोरे यांचे ज्येष्ठ चिरंजीव कॉ.सत्येंद्र मोरे यांच्या सोबत झाले होते. अशा आठवणी त्या नेहमी सांगायच्या. कॉ. देवयानी मोरे यांनीही वेगवेगळ्या चळवळीत सत्येंद्र मोरे यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून काम केले आहेत. त्या दासगाव जनता प्रगतिशील संघाच्या अध्यक्षपदी होत्या. अशा या देवयानी मोरे ज्यांना डॉ.बाबासाहेबांचा लहानपणी सहवास लाभला होता. नुकतेच देवयानी मोरे यांचे निधन झाले.

कोकणातील खोतीविरुद्धचा लढा

गावचा सारा भरण्यासाठी विशिष्ट व्यक्तींना सनदेच्या स्वरूपात हक्क दिले होते. प्राचीन कालखंडात मनुस्मृती व कौटिल्याच्या अर्थशास्त्रात गावच्या खोताचा उल्लेख आढळतो. मध्ययुगीन काळात छ.शिवाजी महाराज, पेशवाई व आधुनिककाळात खोती पद्धत टिकून होती.

बहिष्कृत भारत या साप्ताहिकात दि.१६ ऑगस्ट १९२९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक लेख लिहिला होता. त्यात, दुबळा काळीपराज/राणीपराज, यांचे अतोनात हाल होत असत. मुळ खोता हा हक्क ठेवून दुबळा, काळीपराज व राणीपराज देशोधडीला लागले होते. त्याच कालखंडात सरदार वल्लभभाई पटेल यांनी गुजरात मध्ये 'लॅड-लिगा जमिनदार संघ' नावाची संघटना तयार केली होती. पण गोरगरीब कुळ, कुळरग, राणीपराज, दुबळा यांचे दुःख कमी झालेले नव्हते. याच धर्तीवर खोती पद्धत कोकणामध्ये होती. खोतांमध्ये ब्राह्मण मराठा तसेच मुसलमान जातीचे खोत होते. पण धर्म व जात कोणतीही असो, खोत कुळांना त्रास देत होते. सन १९२९ रोजी बाबासाहेबांनी दापोली व चिपळूणचा दौरा केला. १५ एप्रिल १९२९ च्या दुसऱ्या दिवशी, चिपळूणमध्ये मराठा, महार, चांभार जातीच्या लोकांनी शेतकरी, परिषद घेतली. 'सायमन कमिशन' ची स्थापना होवून मुंबई प्रांतात कमिटी आली होती. भारतातील लोकांचे हक्क कसे आहेत व ब्रिटिश सत्तेत असेपर्यंत आपण हक्क घ्यावे, हे बाबासाहेब सांगत होते. कोकणातील जंजीरा संस्थानात इनामती, वतनी खोती तोटा हिसाफत, खोती पद्धत होती. खोत कुळांना त्रास देत असे. कुळांच्या घरातील पिकविलेले धान्य पाळीव कोंबड्या, नेत असे. कुळ कामावर आले नाही तर त्यांच्या चुलीत पाणी टाकत असत. तसेच मुलींवर पत्नीवर जुलूम करीत. खोतांचे कर, वनपट्टी, पाणपीक, नांगर अशा पट्ट्या खोत घेत असे. सावकारही त्रास देत असे. फ्रेंच राज्यक्रांतीचा आदर्श घेवून १९२७ चा समतेचा रणसंगर करून, खोत आणि सावकाराची जुलूमशाही डॉ. बाबासाहेबांना मोडीत काढावयाची होती.

ब्रिटीश आमदानीत शिक्षणपद्धती प्रचलित होती. याचा फायदा घेऊन लोकहितवादी, आगरकर या रानडे, मा. फुले, शिकून पुढे आले. समाजसुधारक झाले. ब्रिटीशांनी अस्पृश्य तरुणांना सैनिकी दलात घेतले. महार, मांग, चांभार यांची सैन्यात भरती केली. महारांमुळे ब्रिटीश राज्यकर्ते झाले. इ.स. १८१८ पेशवाई नष्ट झाली. पण यापुढे १८९१-९२ मध्ये किचनेर याने अस्पृश्य भरती बंद केली. उच्चवर्णीयांची कपटी विचारधारा पाहून, ब्रिटीशांनी हा घातकी निर्णय घेतला. ब्रिटीश आपल्या हितासाठी पाहिजे तसा वापर करुन घेत.

कुलाबा जिल्ह्यात खोतीविरुद्ध सभा माणगावातील गोरेगाव येथे केली गेली. संघटक म्हणून श्री. भाई चित्रे होते. महार, कुणबी, मराठा, आगरी इ. जातीचे सहकार्य या सभेला लाभले होते. सभा गोरेगाव-चिंचवलीच्या सीमेवर असलेल्या दत्ताच्या देवळात भरविली होती. त्या टप्प्याचे प्रमुख सरखोत लोणरे गावचे महादू रामजी टेंभे होते. पण सभा पोलिसांनी बंद पाडली.

पेशवाई काळात उ. कोकण व द. कोकण असे कोकणचे भाग होते. उ. कोकणात आमचे धेरंड गावचे सुपुत्र नारायण नागू पाटील खोतीविरुद्धचे कर्दनकाळ म्हणून कार्यरत होते. चिखलपचा लढा असो किंवा जंजिराच्या नवाबाला नमते करावयाचे असो, आमचे ना.ना. पाटील बाबासाहेबांच्या मार्गदर्शनाने कार्य करीत होते.

कोकणातील शेतकरी राजकीय स्वातंत्र्य चळवळीत भाग घेत नव्हता. कारण ४ महिने शेती व ८ महिने शेतातील मोलमजुरी कोकणात होती. कुळ व खोत यांचे नेहमी भांडण होत असत. वैमनस्य निर्माण होऊन, त्याचे पडसाद संपात उत्पन्न झाले होते. याची खंत त्यावेळेच्या काँग्रेस पक्षाला होती. केवळ भावनीव, आव आणावा तसा काँग्रेस पक्ष कुळांना वर वर सहकार्य करत असे. म्हणून काँग्रेस पक्षाने १९३६ मध्ये 'Peasent Inquiry Committee' स्थापन केली.

या कमिटीमध्ये १) अच्युतराव पटवर्धन, २) रघुनाथराव खाडीलकर, ३) मोहनलाल दातवाला, ४) श्री. लिमये, ५) केशवराव जेधे इ. सदस्य होते. या कमिटीला नानासाहेब टिपणीस, अनंतराव चित्रे व श्री. ना.ना. पाटील यांच्या कार्यामुळे नमते घ्यावे लागले. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्वा.म. पक्ष व कार्यकारिणी काँग्रेस पक्षाला मारक ठरला, हे लक्षात ठेवा.

कोकणात स्वतंत्र मजूर पक्ष जोरात फैलावला होता. पण बाबासाहेब आंबेडकरांचे दोन साप्ताहिक वैरी होते. १) कुलाबा समाचार २) राष्ट्रतेज या साप्ताहिकात अस्पृश्य समाज व बाबासाहेबांची रणनिती यावर घणाघाती हल्ले होऊन बदनामी करीत असत. महाड चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृती दहन, खोतीविरुद्ध चळवळ, सावकारी विरुद्ध बंड या कार्यामुळे बाबासाहेब व त्यांचे सहकारी यांची बदनामी होऊन पराजयास सामोरे जावे लागले.

स्वतंत्र मजूर पक्षातर्फे ना.ना. पाटील पोयनाड, श्री. सुभेदार सवादरक, महाड सुरबा नाना टिपणीस महाड उ. कोकणात आमदारकीला उभे होते. पण हिंदू महासभेने खोडसाळ प्रचार प्रसार करुन, तीनही बंदे पुढाऱ्यांना पराभूत केले. पैसा, मटण, दारुचे पिंप वितरीत करुन तीनही उमेदवारांना चित केले. प्रचारासाठी सरदार वल्लभभाईंना कुलाबा जिल्ह्यात हिंदू महासभेने आमंत्रण केले होते.

द. कोकणातून निवडून आलेले भाई अनंतराव चित्रे, कॅ. घाडगे, कॉम्रेड डॉ. शामकात परुळेकर, स्वा.म. पक्षातर्फे आमदार झाले. १९ उमेदवार मुंबई प्रांत विधिमंडळात, स्वातंत्र्य मजदूर पक्षातर्फे निवडून आले होते. दि. १७ सप्टेंबर १९३७ मध्ये खोती पद्धत विरुद्ध विधेयक मांडले. शेतकऱ्यांच्या १० जानेवारी १९३८ रोजी मुंबई असेंब्लीवर मोर्चा काढला. कोकण, अहमदनगर, कोल्हापूर, सातारा व पुणे या जिल्ह्यांचाही पाठिंबा मिळाला.

जयगड, दाभोळ व धरमतर बंदरातून सर्व शेतकरी, मजुर मुंबईला जाण्यास निघाले. धरमतर ते मुंबई या प्रवासाची मचव्याची व्यवस्था श्री. ना.ना. पाटील यांनी केली. त्या मचव्यांनी अलिबाग, पेण, उरण येथील आगरी शेतकरी निघाले. महाड, माणगाव, रोहा तालुक्यांसाठी ना.ना. पाटील यांनी विशिष्ट बोट काढली होती. ५०० शेतकरी मोर्च्याला निघाले होते. सुरबानाना टिपणीस ना.ना. पाटील, शांताराम पोतनीस, चिंतामण देशपांडे, ॲड. चंद्रकांत अधिकारी, इ. पुढारी, शेतकरी लोकांना व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत होते.

ना. मोरारजी देसाई व आ. कुंटे यांनी चरीच्या संपाबाबत शेतकऱ्यांवर जमीनदारांनी भरलेल्या मारामारीचा खटला अलिबाग कोर्टात १० महिने चालला व ता. २०-८-१९३८ रोजी निकाल शेतकऱ्यांच्या बाजूने लागला. ना. देसाई यांचे ना.ना. पाटील यांच्यापुढे काहीही चालले नाही. शेतकऱ्यांचा विजय झाला. अशा रितीने खोतीपद्धत नष्ट करावी लागली.

- संतोष बा. शिंदे , मोबा. ८१०८५६५१४७

पान ६ वरुन

पीडितांच्या हक्कांसाठी बाबासाहेबांचा लढा

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. २० मार्च १९२७ या दिवशी रायगड जिल्ह्यातील महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झाला. हा दिवस समता दिन तसेच सामाजिक सबलीकरण दिन म्हणून देखील साजरा केला जातो. माणसाला माणूस म्हणून जगता यावे यासाठी पीडितांच्या हक्कांसाठी बाबासाहेबांनी आजन्म लढा दिला. त्यातीलच एक महत्त्वाचा लढा म्हणजे चवदार तळ्याचा सत्याग्रह.

त्याकाळी असलेल्या अमानवीय जातीव्यवस्थेमुळे जनावरांपेक्षा देखील हालाखीचे जीवन अस्पृश्यांना जगावे लागत होते. त्यांचा दोष इतकाच की त्यांचा जन्म एका विशिष्ट जातीमध्ये झाला होता. वर्षानुवर्षे अन्याय सहन करत आलेल्या आपल्या समाजाला या अन्यायातून मुक्त करणे हे त्यावेळी मोठे आव्हान होते.

उच्चवर्णीयांकडून वेळोवेळी मिळणारी अपमानास्पद वागणूक, गुलामगिरी एवढेच काय तर निसर्गाची देणगी म्हणजे पाणी ते देखील त्यावेळी अस्पृश्यांना पिण्याचा किंवा सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा साधा अधिकार नव्हता. भारतीय जातीव्यवस्थेमुळे अस्पृश्यांना उच्च जातीय हिंदूपासून वेगळे ठेवण्यात आले होते. अस्पृश्यांना पाण्याच्या मुख्य स्त्रोतामधून पाणी घेण्यास तसेच मुख्य रस्त्यावरून चालण्यास देखील परवानगी नव्हती. ऑगस्ट १९२३ मध्ये मुंबई कायदे मंडळाने एक निर्णय पारित केला. त्यामध्ये सरकारी खर्चाने बांधलेल्या आणि सुस्थितीत ठेवलेल्या सर्व मालमत्तेवर सर्वांना म्हणजेच अस्पृश्यांनाही हक्क असेल. महाडच्या नगरपालिकेनेही जानेवारी १९२४ रोजी या कायद्याची अंमलबजावणी करणारा निर्णय पारित केला. परंतु या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालीच नाही. सत्याग्रहासाठी रायगड जिल्ह्यातील महाड हे शहर निवडण्यात आले कारण उच्च जातीय हिंदूंनी हे धोरण प्रत्यक्षात आणण्यासाठी तयारी दाखवली होती. त्यामध्ये गंगाधर नीलकंठ सहस्त्रबुद्धे, अनंत विनायक चित्रे, सुरेंद्रनाथ टिपणीस हे महाड नगरपालिकेचे प्रमुख देखील यामध्ये सहभागी होते. यांच्यासह अन्य पुरोगामी सामाजिक कार्यकर्ते व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सहयोगी महाड सत्याग्रहाच्या दरम्यान बाबासाहेबांना मदत करत होते.

१९२७ साली सुरेंद्रनाथ टिपणीसांना नगरपालिकेचे प्रमुख म्हणून सर्व सरकारी संपत्ती, सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांसाठी खुली केली आणि त्यानिमित्ताने आंबेडकरांना सभा घेण्यासाठी आमंत्रण दिले. सभेनंतर सर्वजण चवदार तळ्याकडे गेले. आंबेडकर सर्वात प्रथम त्या तळ्यामधून पाणी प्यायले आणि त्यानंतर तिथे जमलेले सर्व लोक त्या तळ्यातील पाणी प्यायले. त्यावेळी सुमारे ३ हजारांहून अधिक लोक या सभेसाठी आणि नंतर चवदार तळ्याचे पाणी पिण्यासाठी आलेले होते.

चवदार तळ्याचा सत्याग्रह होत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकांना उद्देशून म्हटले होते. चवदार तळ्याचे पाणी प्यायल्याने तुम्ही आम्ही अमर होऊ अशातला भाग नाही. आजपावेतो चवदार तळ्याचे पाणी नव्हतो तरी तुम्ही आम्ही काही मेलो नव्हतो. चवदार तळ्यावर जावयाचे ते केवळ तळ्याचे पाणी पिण्याकरीता नाही. इतरांप्रमाणे आम्हीही माणसे आहोत हे सिद्ध करण्याकरीताच त्या तळ्यावर आपल्याला जावयाचे आहे. हा सत्याग्रह म्हणजे भारताच्या इतिहासातील एक अनन्यसाधारण घटना नोंद करण्यात आली आहे.

राज्य शासनाने महाडच्या चवदार तळ्याचे सौंदर्यीकरण करण्यात आल्यानंतर हे तळे राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केले तसेच सामाजिक न्याय विभाग येथे भव्य असे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक उभारण्यात आले आहे. नगरपालिकेच्या माध्यमातून चवदार तळ्याचे स्वच्छता तसेच साफसफाई योग्य प्रकारे केली जाते. दरवर्षी महाडमध्ये चवदार तळे सत्याग्रह आता वर्धापन दिन भव्य स्वरूपात साजरा केला जातो. आज चवदार तळ्यामुळे महाड शहराला महत्व प्राप्त झाले आहे.

- चंद्रकांत कोकणे, मोबा. ९४२१२५२००९

रायगडावर बाबासाहेब

घेतला होता, ज्यांनी त्या काळात शिवरायांना विरोध केला होता अशा लोकांच्या उरावर बसून त्यांनी राज्याभिषेक करून घेऊन एक धम्मक्रांती केली होती. त्याचप्रमाणे मनुस्मृतीचे दहन करून बाबासाहेबांनी रायगडच्या पायथ्याला धम्मक्रांती केली. चवदार तळ्यातील पाणी पिऊन क्रांती केली होती. ही क्रांती करताना जय जिजाऊ व जय शिवराय या घोषणा देण्यात आल्या होत्या. त्याकाळी बाबासाहेबांनी अत्यंत आत्मियतेने संपूर्ण रायगडचा परिसर बघितला होता. यावेळी बाबासाहेबांबरोबर राज भोज, शिवथरकर मास्तर आदींनी तेव्हा एक रात्र रायगडावर काढली होती. डॉ.बाबासाहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर एक सुंदर पुस्तकही लिहिले आहे. बाबासाहेब महाडमध्ये मुक्कामाला असताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा एक पुतळा बनवून घेतला होता. तो पुतळा आजही वडके यांच्या घरामध्ये बघण्यासाठी मिळतो. त्यांनी तेथील शिल्पकार वडके यांच्याबरोबर स्वतः हजर राहून हा छत्रपतींचा पुतळा तयार करून घेतला होता.

सलग सुट्ट्यांमुळे जिल्ह्यातील पर्यटन फुलणार

मुरूडमध्ये जोरदार बुकिंग सुरू

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

१० वी १२ वीच्या परीक्षा संपून या आठवड्यात सलग सुट्ट्या देखील आल्यामुळे मोठ्या प्रमाणावर राज्यातील पर्यटक रायगडच्या समुद्रकिनारी पर्यटन ठिकाणांकडे वळणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. १ मे, नंतर उन्हाळी सुट्टी सुरू होणार असल्याने आणि कोरोना मुक्त वातावरणामुळे कुटुंबासमवेत मोठ्या संख्येने पर्यटक या सीझन मध्ये फिरण्यासाठी समुद्रकिनारी येतील अशी दाट शक्यता अनुभवी मंडळींनी बोलताना व्यक्त केली.

जिल्ह्यात अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन आदी समुद्रकिनारे पर्यटकांनी फुलून जातील असे स्पष्ट संकेत लॉजिंग आणि हॉटेल्स व्यावसायिकांनी बोलताना दिले. जिल्ह्यातील सर्वच किनारे रमणीय असून अधिक मोठया संख्येने पर्यटक किनारी पर्यटनाकडे खेचले जात असल्याचे दिसून येत आहे. मुरूड-जंजिरा तालुका ऐतिहासिक वास्तू आणि निसर्गरम्य तालुका म्हणून प्रसिद्ध असून जंजिरा संस्थानची राजधानी होती. बारशिव, काशीद, सर्वे, नांदगांव, मुरूड असे पांच ते सात समुद्र बीच तालुक्यात असून येथील किनाऱ्यावर फिरण्यात एक वेगळीच मौज वाटते. या आठवड्यात गुरुवारपासून पर्यटकांची वर्दळ सुरू होईल. मुरुडमध्ये पर्यटकांची लॉजिंग बुकिंग सुरू झाल्याची माहिती हिरा रेसिडेन्सी लॉजचे मालक महेंद्र पाटील, यांनी दिली.

सलग सुट्टी असल्याने चाकरमानी वर्ग कुटुंबातील सदस्यांना घेऊन पर्यटनासाठी बाहेर पडतील असे संकेत पाटील, यांनी बोलताना दिले. रायगडच्या किनाऱ्यावर वॉटर स्कुटर्स, बनाना राईडर्स, समुद्रातील बोटिंग असे जलक्रीडांची साधने देखील उपलब्ध झाली आहेत. श्री हरिहरेश्वर (दक्षिण काशी), दिवेआगर, जीवना बीचकडे जाण्यासाठी अलिबागहून मुरूड तालुका मार्गे आगरदांडा ते दिघी खाडीतून जंगल जेटीने वाहने घेऊन थेट जाण्याची सुविधा रात्री पर्यंत उपलब्ध आहे. याचाच अर्थ अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन हा सागरी किनारा पर्यटन विकासात महत्वाची भूमिका बजविणार आहे.कारण रायगडात धार्मिक, ऐतिहासिक, आणि निसर्गरम्य अशी स्थळे भरपूर आहेत. शिवाय पुढे रत्नागिरीकडे जाण्यासाठी हाच जलमार्ग महत्वाचा ठरणार आहे. सध्या दुपारी तापमान ३२ ते ३४ सेल्सिअस दरम्यान असले तरी किनाऱ्यावर सायंकाळी ६ नंतर थंडपणा जाणवतोय.

म ह त्त्वा चे

लक्ष्मण ठाकूर यांचे निधन

। नागोठणे । वार्ताहर।

नागोठण्यातील सामाजिक कार्यकर्ते व वांगणी या गावचे रहिवासी लक्ष्मण गणपत ठाकूर (५५) यांचे शनिवार, दि.९ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात

पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, तीन भाऊ, तीन बहिणी यांच्यासह मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी व अंतिम धार्मिक विधी सोमवार, दि.१८ एप्रिल रोजी वांगणी येथील निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या कुटुंबियांकडून देण्यात आली आहे.

श्रीसंत बाळूमामा उत्सवाचे आयोजन

। खोपोली । प्रतिनिधी ।

अखंड भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीसंत बाळूमामा देवाचा उत्सव शनिवार दिनांक १६ एप्रिल २०२२ रोजी मोठ्या उत्साहात पार पडणार आहे हा उत्सव श्रीसंत बाळूमामा मंदिर पांगोळी धनगर वस्ती लोणावळा येथे आयोजित करण्यात आला आहे.

खो-खो पंच परीक्षेचे पनवेल येथे आयोजन

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा खो- खो असोसिएशनतर्फे शुक्रवारी (दि. १५) पनवेल येथे जिल्हास्तरीय खो-खो पंच परीक्षा घेण्यात येणार आहे. रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने पनवेल तालुका क्रीडासंकुल, तहसील कार्यालयाजवळ पनवेल येथे ही परीक्षा घेण्यात येणार आहे, अशी महिती रायगड जिल्हा खो-खो असोसिएशनचे कार्यवाह आशिष पाटील यांनी दिली.

जिल्ह्यातील सर्व शाळांमधील क्रीडा शिक्षक, क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, क्रीडाप्रेमी खो-खो पंच परीक्षेस बसू शकतील. अधिक महितीसाठी आशिष पाटील ९४२११६४८१७, राज्य क्रीडा मार्गदर्शक मनिषा मानकर ७०२०५५५३२९, लावण्य मगर ९९८७०७७३१७, अमोल जाधव ९७७३४२२२१४ यांच्याशी संपर्क साधावा.

कॅम्पस मुलाखतीस उत्स्फूर्त प्रतिसाद

५२ विद्यार्थ्यांनी नोंदविला सहभाग

। आगरदांडा । प्रतिनिधी।

मुरुड वसंतराव नाईक महाविद्यालय व आयसीआयसीआय बँक यांच्या संयुक्त विद्यमाने बँक नोकरीसाठी चाचणी पेपर, ट्रेनिंग व मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. याकरिता महाविद्यालयातील ४२, तर जिल्हाभरातून नऊ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

यावेळी प्रा.डॉ. मेहबुब नगरबावडी, उपप्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण, आयएफबीआय/ एनआयआयटी/ आयसीआयसीआय बँकेचे विभागीय अधिकारी निरंजन मोहिते, समन्वयक मितेश अहेर, डॉ. मुरलीधर गायकवाड, संदेश दांडेकर, सहाय्यक शाखाप्रमुख आशिष राऊत, ग्रंथपाल गजानन मुनेश्वर, मोहित हसवारे, श्रीकांत पालशेतकर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा.डॉ. मेहबुब नगरबावडी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, व्यवसाय व नोकरीच्या विविध संधी मिळविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. चालून आलेल्या संधीतून आपले कौशल्य सादर करुन आपले करिअर घडवा. आयएफबीआय/एनआयआयटी/ आयसीआयसीआय बँकेचे विभागीय अधिकारी निरंजन मोहीते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, बँकिंग व विमाक्षेत्रातील रोजगारांच्या विविध संधी आमच्या आयसीआयसीआय बँकेमार्फत मिळणार आहेत. त्याकरिता विद्यार्थ्यांचे ऑफलाईन चाचणी पेपर घेतले जातील. त्यानंतर बौद्धिक चाचणी, मुलाखती व क्षमता चाचणी त्यानंतर त्यांची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ४५ दिवसांचे प्रशिक्षण दिले जाईल. त्यामधून नोकरीची संधी प्राप्त होईल. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. मुरलीधर गायकवाड यांनी केले.

महाडमध्ये पंचगव्य चिकित्सा संमेलन

। महाड । प्रतिनिधी।

पंचगव्य डॉक्टर्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांनी आयोजित केलेले आठवे पंचगव्य चिकित्सा संमेलन महाड येथील वीरेश्वर मंदिरामध्ये ८ ते १० एप्रिल रोजी उत्साहात पार पडले. राजापूर सोलगाव येथील पंडित पंचगव्य गुरुकुल विस्तार केंद्र व संमेलन समितीने या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

या कार्यक्रमाला पंडित पंचगव्य गुरुकुलचे सुहास पंडित, सई पंडित, संदीप सुतार, प्रमोद केळकर पंचगव्य डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष मधुकर फडोल, उपाध्यक्ष जमानंद कांबळे, सचिव योगेश आंब्रे व महाराष्ट्रातील विविध भागातून आलेले दीडशेहून अधिक पंचगव्य चिकित्सक उपस्थित होते. ९ एप्रिल रोजी सकाळी गो प्रचारासाठी विरेश्वर मंदिर येथून महाड बाजारपेठमार्गे गो पदयात्रा काढण्यात आली.

या पदयात्रेमध्ये पंचगव्य विद्यापीठम कांचीपुरमचे कुलपती निरंजन वर्मा, उपकुलपती कमल टावरी यांच्या नेतृत्वाखाली ही पदयात्रा काढण्यात आली.

'अभंगाक्षरे' रोज लाखोंच्या भेटीला

चित्रकार प्रकाश पाटील यांचा अभिनव उपक्रम

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

संत वचनांचा प्रसार व प्रचार व्हावा या उद्देशाने पनवेल येथील सुप्रसिद्ध चित्रकार, कवी, सुलेखनकार व अभंगाक्षरेकार प्रकाश पाटील हे मागील वर्षभरापासून एक अभिनव उपक्रम राबवित आहेत. सुंदर व सृजनशील चित्राकृतींचे कोंदण जडवलेली संत वचनांची 'अभंगाक्षरे' तयार करून समाज माध्यमांवर नित्यनियमाने पाठवीत आहेत. या अनोख्या संतवचनांनी महाराष्ट्रातील लाखो लोकांची सकाळ भक्तीमय होत आहे.

संतांचा सहवास त्यांच्या वाङ्मयाच्या माध्यमातून लाभावा आणि मन व डोळे दोन्ही तृप्त व्हावे आणि आपले जीवन सफल व्हावे या उद्देशाने प्रकाश पाटील हा अभिनव उपक्रम राबवित आहेत. संतविचार दृढ व्हावा व त्यातून संतांच्या विचारांची अनुभूती आपल्याला मिळावी, हाच हेतू प्रकाश पाटील यांचा आहे.

संत साहित्य अभ्यासक शरद

कांतीलाल शिंपी सांगतात की प्रत्येक सकाळ भक्तीमय करणारी 'अभंगाक्षरे' महाराष्ट्रभर दररोज सकाळी हजारो लोक, संतांचे अभंग पाहतात, वाचतात आणि त्याच श्रद्धेने इतर लोकांना सादर व भक्तिभावाने पाठवतात. हा आनंदाचा व्यवहार भक्तीच्या माध्यमातून द्विगुणित करतात. कारण संत वचनांनी दृष्टी मिळत असते. हेच संतांचे अपार उपकार आहेत. आपले जीवन सफल व्हावे, असे वाटत असल्यास संतांचा सहवास त्यांच्या वाङ्मयाचा ध्यास असावा. असे झाल्यास सफलता आपला श्वास होईल आणि आपले जीवन कृतकृत्य होईल. हाच संतांचा सुद्धा विचार आहे. म्हणूनच संतांच्या भावपूर्ण अशा अभंगांना साजिरे, गोजिरे, अगदी विलोभनीय रुप देऊन रसिकांपर्यंत, भक्तांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य गेले वर्षभर नित्यनेमाने अभंगाक्षरे या नावाने प्रकाश पाटील अविरतपणे करीत आहेत. आणि या माध्यमातून त्यांच्याकडून वारकरी संप्रदायाची सेवा रोज प्रातःकाली होत आहे. हा उपक्रम अव्याहत अखंड सुरूच आहे. दररोज प्रातःकाळी एक सुंदर कलाकृती 'अभंगाक्षरे' च्या माध्यमातून महाराष्ट्रातील लाखो वारकरी, विठ्ठलभक्त, संतप्रेमी, भाविक यांच्या फेसबुक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम तसेच अनेक व्हाट्सअप समुहावर त्या दिवसाचा सुलेखन प्रकारात लिहिलेला संतांचा अभंग वा ओवी झळकत असते. खरंतर या लाखो अभंग प्रेमींना आता याची सवयच झाली आहे.

संत साहित्याचा गाढा अभ्यास

संतांचे अभंग सुलेखन प्रकारात रेखाटताना, त्यात काही पाठभेद, चुका होऊ नयेत यासाठी प्रकाश पाटील हे सकल संत गाथा, ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, एकनाथांचा गाथा, ज्ञानेश्वर महाराज अभंग गाथा, अशा अनेक संदर्भग्रंथाचा सुलेखन करताना आधार घेतात. याचे कारण म्हणजे सश्रद्ध, वाचक व वारकरी यांचा अभंगाबद्दलचा अभ्यास अतिशय गाढा असतो. हे लक्षात घेऊन त्यात कोणत्याही प्रकारे लिहिताना चूक होऊ नये म्हणून त्यांचे दोन तीन वेळा वाचन करून, खात्री केलेली असते व नंतरच ते प्रसारमाध्यमांवर प्रसारित होते.

गडदाव गावावर ऐन उन्हाळ्यात पाणी संकट

। आंबेत । वार्ताहर ।

जिल्ह्यातील म्हसळा तालुक्याला भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असताना आता आंबेत खाडी पट्टा विभागातील ग्रुप ग्रामपंचायत संदेरी हद्दीतील मौजे गडदाव गावात देखील हीच परिस्थिती निर्माण झाली आहे. दरवर्षीचा उन्हाळा हा महाराष्ट्रात पाणीटंचाईचा काळ असतो. यावर्षीही राज्यात पाणीटंचाई आहे, पण ती निव्वळ उन्हाळ्यामुळे नाही तर वीजटंचाई, गैरप्रशासन, नियोजनाचा अभाव आणि पाण्याचा बेदरकार वापर ही पाणीटंचाईची मुख्य कारणे आहेत. राज्याच्या विविध भागातील पाणीटंचाईची स्थिती आणि त्यावर

करण्यात येणारे उपाय यांचा विचार केला तर काटकसर ही योजना मुळात कुठे राबविताना दिसत नाहीत. मात्र बाजूलाच संदेरी धरण असून ही आज संदेरी ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील गडदाव गावावर ऐन उन्हाळ्यात पाणी संकट निर्माण झाल्याने गावावर खार पाणी पिण्याची वेळ आली आहे.

या ग्रामपंचायतीच्या नियोजन शून्य कारभाराचा गावकर्यांनी हंडा मोर्चा काढत तीव्र निषेध व्यक्त केला, यामुळे या गावात पाण्याच राजकारण चांगलच तापल आहे.गावात अन्य पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध नसल्याने गावकऱ्याची दोन ते तीन मैल पाण्यासाठी वणवण होताना दिसत आहे. दुसरीकडे विहिरीला खार पाणी लागल्याने नाईलाजस्तव हे खार पाणी पिण्याची वेळ येथील गावकऱ्यांवर आली आहे. याबाबत येथील गावकऱ्यानी काही दिवसांपूर्वी तालुक्याचे ग्रामविकास अधिकारी, पाणी समिती कार्यालय, प्रशासन यांना पत्र देऊन सदर घटनेची संपूर्ण माहिती निदर्शनात आणून देखील कोणतीही प्रशासकीय यंत्रणा या गोष्टीची चौकशी करण्यास पोहचली नसल्याने ग्रामपंचायत जाणून बुजून या गावावर मनमानी कारभार करत असल्याचा आरोप देखील गडदाव ग्रामस्थांनी यावेळी प्रस्तुत प्रतिनिधींशी वार्तालाप करताना व्यक्त केला. त्यामुळे गावाला लागून धरण असून देखील पाणी नियोजन समितीच्या

> **संदेरी ग्रुप ग्रामपंचायतीच्या नियोजन शून्य कारभारामुळे आज आमच्या गावावर खार पाणी पिण्याची वेळ आली आहे. संबंधित विभागाने या गोष्टीकडे गंभीरतेने पाहून गावावर आलेले संकट दूर करावे अन्यथा गाव मोठ्या दुष्काळाला बळी पडेल.**
>
> **-अनंत जाधव**
> **गावचे पाटील**

कामचुकारपणामुळे गावकऱ्यांची खार पाणी पिण्याची वेळ आली आहे याबाबतीत संबंधित विभागाने गडदाव गावावर होत असलेला अन्याय लवकरात लवकर मार्गी लावून या गोष्टीची सखोल चौकशी करावी अन्यथा येत्या दिवसातच तीव्र आंदोलन छेडू असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

अनधिकृत बांधकामांवर कारवाई करणार का?

। सुधागड-पाली । वार्ताहर ।

पाली नगरपंचायत क्षेत्रात जागोजागी तुंबलेली गटारे व नाले हे नेहमीचं चित्र आहे. हे चित्र बदलण्याचे पाली नगरपंचायतीने मनावर घेतले आहे. त्याच अनुषंगाने पाली शहरात नगरपंचायतीने स्वच्छता मोहीम हाती घेतली असून, पाली नगरपंचायत हद्दीतील गटारे स्वच्छ करण्याचे व गाळ काढण्याचे काम सुरू केले आहे. पाली नगरपंचायतीचे नगरसेवक आपापल्या वॉर्डमध्ये जातीने लक्ष देत गटारे स्वच्छ करण्याचे काम करुन घेत आहे. ही साफसफाई करताना, सफाई कामगारांना बऱ्याच अडचणी येत आहेत. कित्येक ठिकाणी गटारांवर दुकानदारांनी कायमस्वरूपी स्लॅब टाकले आहेत. तसेच काही ठिकाणे गटारांवर बांधकामे करण्यात आली आहेत.

याठिकाणी सफाई कामगारांना गटारे साफ करता येत नाहीत. त्यामुळे बाटल्या, कचरा अडकून पाणी तुंबत आहे.

त्यामुळे या परिसरात दुर्गंधी पसरली आहे. या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करणे गरजेचे आहे, तसे न केल्यास गटारे साफसफाई हा केवळ एक फार्स आहे, अशी भावना आमच्या मनात निर्माण होईल, असे नागरिकांचे म्हणणे आहे. पाली नगरपंचायत हद्दीतील गटारांवरील अनधिकृत बांधकामांवर पाली नगरपंचायत कारवाई करणार का? असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे.

कर्जतमधील आंबेडकर चळवळीची परंपरा

कर्जत या मुंबईपासून जवळ असलेल्या तालुक्यात आंबेडकरी चळवळ प्रचंड वेगाने पसरली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आचार विचार कर्जत तालुक्यातील बौद्ध समाजातील तरुणांनी तात्काळ आत्मसात करून प्रसंगी डॉ. बाबासाहेब यांच्यासमवेत धम्माची दीक्षा नागरपूर मध्ये घेताना सोबत दिलेली तरुण या कर्जत तालुक्यातील होते.

धर्म वाढविण्याचे काम आंबेडकरी चळवळीमधील असंख्य कार्यकर्ते कर्जत तालुक्यात प्रसिद्धीपासून लांब राहून आजही करीत आहेत. भारतीय बौद्ध महासभामध्ये धर्माचे काम करणारे यांची एक साखळी तयार असून हि परंपरा यापुढे देखील कायम राहील, असे कार्य कर्जत तालुक्याच्या ८५ गावात गावात अखंडपणे सुरु आहे.

तालुक्यात बौद्ध समाजाची अखंड वस्ती असलेले एकही गाव नाही, पण कर्जत आणि नेरळचा शहरी भाग वगळता तालुक्यातील ८५ गावांमध्ये

हा समाज गुण्यागोविंदाने राहत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर घडले त्या मुंबई महानगरपासून कर्जत तालुका दोन तासांच्या अंतरावर असल्याने कर्जत तालुक्यातील असंख्य कार्यकर्ते बाबासाहेबांच्या संपर्कात होते.

त्यातील काही तरुणांनी धम्माची दीक्षा घेताना देखील साथ दिली होती अशी उदाहरणे कर्जत तालुक्यात आहेत. देश स्वतंत्र झाल्यानंतर १९५६ मध्ये भारतीय बौद्ध महासभेची स्थापना झाली आणि त्यात संघटनेत बौद्ध धर्माचे काम करण्यासाठी कर्जत तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते सहभागी झाले होते.

मुंबईतून माहिती घेऊन कर्जत तालुक्यातील ८४ गावात पोहचण्याचे काम करणाऱ्या आंबेडकरी कार्यकर्त्यांनी त्या काळात आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या आणि अत्यंत गरीब असलेल्या बौद्ध समाजातील कुटुंबावर एखादे संकट आले की, समाजातील सर्व कार्यकर्ते आपल्यापरीने आर्थिक आणि शारीरिक मदत कार्याला पोहचायचे. त्यामुळे महासभेच्या माध्यमातून सुरु असलेले काम पाहून बौद्ध समाजातील सर्व लोकांमध्ये धर्माचे कार्य करणारी संघटनेबाबत चांगले मत निर्माण होऊ लागले.

भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून कर्जत तालुक्यात आंबेडकरी विचार पोहचवण्याबरोबर आंबेडकरी आचरणाप्रमाणे कर्जत तालुक्यात सामाजिक कामे सुरु होती.

मात्र हे विचार अधिक लोकांपर्यंत पोहचावे यासाठी कर्जतच्या अभिनव शाळेत युगपुरुष हे नाटक याच कार्यकर्त्यांनी सादर केले आणि गाजवले देखील होते. अशी नाटके आणि कव्वालीच्या माध्यमातून धर्माचा प्रसार आणि प्रचार करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीला गावोगावी होऊ लागला होता.

तालुक्यात त्यावेळी पक्षीय राजकारण नव्हते, मात्र कर्जत तालुक्यात भारतीय बौद्ध महासभेच्या शाखा गावोगावी मात्र उभारल्या जाऊ लागल्या होत्या. त्यातून धर्माचा प्रसार करतानाच धर्माच्या प्रसारासाठी बौद्ध विहार असायला हवेत अशी मागणी पुढे येऊ लागली आणि आज कर्जत तालुक्यात अनेक ठिकाणी बौद्ध विहार आणि बौद्ध समाज मंदिरे उभी राहिली आहेत.त्यात कडाव, डिकसळ, किरवली, नेरळ, गुंडगे, दहिवली, कर्जत बुद्धनगर, कशेळे येथून कार्य सुरु आहे. मात्र तालुक्यात भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक शासनाच्या माध्यमातून उभे राहिलेले नाही ही खंत देश स्वतंत्र होऊन ७५ वर्षे झाली तरी देखील अनेकांना आहे.

या समाजाने धर्माने कर्जत तालुक्यातून अनेक गीतकार, गायक, कवी, साहित्यिक जन्माला आले आहेत. त्यांचे सर्वांसाठी प्रेरणादायी असून साहित्यिक लक्ष्मण अभंगे, गायक हिरामण अभंगे, अशोक अभंगे, किसान साळवी, दत्ताजी साळवी तर कवी म्हणून चंद्रकांत पवार, गोपीनाथ ओव्हाळ यांचे कार्य महत्त्वाचे आहे. या सर्वांच्या कार्याची आणि भारतीय बौद्ध महासभा यांच्या वाटचालीबद्दल साहित्य म्हणून प्रकाशित झालेले नाही ते भविष्यात यायला हवे असे काहींचे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीच्या निमित्ताने समोर आले आहे.

- संतोष पेरणे
८६९८९०४००१

हॅशटॅग 'जालियानवाला बाग' सोशल मीडियावर ट्रेंड

। वर्षा मेहता ।
। अलिबाग ।

१०३ वर्षांपूर्वी १३ एप्रिल १९१९ रोजी जालियनवाला बाग हत्याकांड घडले होते. ब्रिटीश सरकारच्या नोंदीनुसार, कर्नल रेजिनाल्ड डायरने केलेल्या अंदाधुंद गोळीबारात पुरुष, स्त्रिया आणि मुलांसह ३७९ लोक मारले गेले तर १,२०० जखमी झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीडितांना श्रद्धांजली वाहिली आणि सांगितले की, त्यांचे अतुलनीय धैर्य आणि बलिदान येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देत राहील.

गेल्या वर्षी उद्घाटन झालेल्या जालियनवाला बाग स्मारक संकुलाचा व्हिडिओही त्यांनी शेअर केला. १३ एप्रिल १९१९ ची ती १० मिनिटे आपल्या स्वातंत्र्यलढ्याची अजरामर गाथा ठरली, त्यामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करू शकलो आहोत, असे ते म्हणाले. या हत्याकांडामुळे भारतीय संतप्त झाले आणि महात्मा गांधींनी असहकार आंदोलनाची हाक दिली होती. भारताच्या इतिहासातील तो काळा दिवस असल्याचे अनेकांचे मत होते. सार्वजनिक मेळाव्यावर बंदी घालून ब्रिटिशांनी कठोर कायदा लागू केला होता. पंजाबमधील अमृतसर येथील जालियनवाला बाग येथे बैसाखीनिमित्त निशस्त्र आंदोलक आणि यात्रेकरूंचा जमाव जमला होता. स्वातंत्र्यसैनिक सत्य पाल आणि डॉ. सैफुद्दीन किचलू यांच्या अटकेचा निषेध करत शांततेने निषेध करण्यासाठी जमाव जमला होता. जेव्हा कर्नल डायरला मेळाव्याची माहिती मिळाली तेव्हा ते सुमारे ५० सैनिकांसह घटनास्थळी पोहोचले आणि त्यांना त्या लोकांवर गोळीबार करण्यास सांगितले.

SOCIAL MEDIA पडसाद

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)